दैनिक
www. sahyandrinews.com
# सह्याद्रीचा राखणदार
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •
कृषी पर्यटन व ॲडवेंचर पार्क
• (महाराष्ट्र) वर्ष ०२ • अंक ११ • RNI : MAHMAR/2023/87818 • बुधवार दि.३० ऑक्टोबर २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# कॉपी करून पास होण्यात काय मजा:अभ्यास करून पास व्हा अन् सर्टिफिकेट दाखवा

## सुप्रिया सुळे यांचा अजित पवारांना टोला

**पुणे (वृत्तसंस्था)**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी मंगळवारी आपले बंधू तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजित पवार यांच्यावर शेलक्या शब्दांत टीका केली. कॉपी करून पास होण्यात काय मजा? हिंमत असेल तर अभ्यास करून पास व्हा आणि आपले प्रमाणपत्र दाखवा, असे त्या म्हणाल्या.

बारामती विधानसभेतील राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाचे उमेदवार युगेंद्र पवार यांच्या प्रचारार्थ मंगळवारी सकाळी कान्हेरी येथे सभा झाली. त्यात बोलताना सुप्रिया सुळे यांनी अजित पवार यांचा समाचार घेतला. त्या म्हणाल्या, महाराष्ट्रात सध्या बरेच कार्यक्रम सुरू झालेत. मी अनेक ठिकाणी लावण्यात आलेले बॅनर पाहते. त्या बॅनरवर लिहिलेले आहे की, हे चिन्ह तुमचे नाही. या चिन्हाची लढाई न्यायालयात सुरू आहे. त्यामुळे ते (अजित पवार) विसरले असतील. पण मी अजून विसरले नाही.

पक्ष व चिन्ह हिसकावून घेण्याचे काम अदृश्य शक्तीने केले आहे. मी कोणत्याही व्यक्तीच्या विरोधात बोलत नाही. मी अदृश्य शक्तीविरोधात बोलत आहे. कारण, त्याच शक्तीने आमचे घर फोडले. पक्ष व चिन्ह हिसकावून घेण्याचे काम केले. लोकसभा निवडणुकीत मी कोणत्या चिन्हावर निवडणूक लढणार हे मला देखील माहिती नव्हते. पण आम्ही मिळेल त्या चिन्हावर निवडूक लढून व जिंकून दाखवली.सुप्रिया सुळे पुढे म्हणाल्या, निवडणूक आयोगापुढे ज्यावेली पक्षाच्या चिन्हाची सुनावणी सुरू होती, तेव्हा शरद पवार ४-४ तास तिथे बसून असायचे. ते काही बोलत नव्हते. शांत बसायचे. त्या ठिकाणी आम्हीही होतो. तेव्हा अनेकजण आमची थट्टा उडवत होते. तुमचे चिन्ह व पक्षही जाणार अशी टिंगल टवाळी ते करायचे. पण आम्ही त्यांना काहीही उत्तर दिले नाही. पण आज मी सांगते की, हा देश संविधानाने चालणार आहे. हा देश कोणत्याही अदृश्य शक्तीने चालणार नाही. यावर माझा ठाम विश्वास आहे.

अरे कॉपी करून पास होण्यात काय मजा? अभ्यास करून पास होऊन सर्टिफिकेट घेण्याचा आनंदच वेगळा असतो. पक्षात फूट पडल्यानंतर मला काहीशी भीती वाटत होती. सर्वजण गेल्यामुळे आपले काय होईल? असे मला वाटत होते. लोकसभा निवडणुकीत मतदारसंघात दौरे करायचे तेव्हा मला पुढे काय होणार असा प्रश्न पडायचा. पण त्या निवडणुकीत मला समजले की, खरी ताकद जनतेत असते हे माझ्या लक्षात आले. जनतेने आपली ताकद लोकसभेला दाखवून दिली.कुणी काहीही म्हटले तरी बारामती मतदारसंघ ना मला कळतो ना त्यांना (अजित पवार). हा मतदारसंघ केवळ शरद पवार यांना कळला आहे, असेही सुप्रिया सुळे यावेळी आपल्या विरोधकांवर विशेषतः अजित पवारांवर टीका करताना म्हणाल्या. सुप्रिया सुळे यांनी यावेळी अजित पवारांचे नाव घेतले नाही. पण त्यांचा रोख त्यांच्याकडेच होता हे स्पष्ट आहे.



## विधानसभा निवडणुका २०२४: चंद्रपूर पोलिसांची मोठी कारवाई, वरोरा येथील नाकाबंदीमध्ये ७५ लाखांची रोकड जप्त

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणुका २०२४ च्या पार्श्वभूमीवर चंद्रपूर जिल्ह्यातील पोलिसांनी नाकाबंदी व पेट्रोलिंग दरम्यान मोठी कारवाई करत संशयित चारचाकी वाहनातून तब्बल ७५ लाख रुपयांची रोकड जप्त केली आहे. जिल्ह्यात अवैध रोकड वाहतूक रोखण्यासाठी सर्वत्र कडक सुरक्षा व्यवस्थेचे जाळे विणले असून, निवडणूक आचारसंहितेचे उल्लंघन रोखण्यासाठी एस.एस.टी. (स्टॅटिक सर्व्हिलन्स टीम) पॉइंट्स आणि एफ.एस.टी. (फ्लाईंग स्क्वॉड टीम) पेट्रोलिंग पथकांची नियुक्ती केली आहे.

गुप्त माहितीच्या आधारे २९ ऑक्टोबर रोजी, वरोरा पोलीस स्टेशन हद्दीत एका संशयित चारचाकी वाहनाची तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान वाहनात मोठ्या प्रमाणात रोकड असल्याचे आढळून आले. वरोरा पोलीस आणि एफ.एस.टी. पथकाने तातडीने कारवाई करत वाहनाच्या चालकाला चौकशीसाठी ताब्यात घेतले. मात्र, चालकाकडून ७५ लाख रुपये रोख रकमेच्या वाहतुकीचे स्पष्ट आणि समाधानकारक कारण मिळाले नाही. त्यामुळे पोलिसांनी पंचनाम्यानंतर सदर रक्कम जप्त करून पुढील तपासासाठी आयकर विभागाच्या स्वाधीन केली आहे.

चंद्रपूर जिल्ह्यात विधानसभा निवडणुकांच्या अनुषंगाने मोठ्या प्रमाणात एस.एस.टी. पॉइंट्स आणि एफ.एस.टी. पथकांच्या मदतीने ठिकठिकाणी नाकाबंदी करण्यात आली आहे. आचारसंहितेचे पालन व्हावे, मतदारांवर दबाव येऊ नये आणि मतदारसंघात सुरक्षित वातावरण राहावे या उद्देशाने कडक उपाययोजना करण्यात आल्या आहेत. पोलिसांनी विशेष तपासणी मोहीम राबवून वाहनांची कसून तपासणी करत अवैध रोख रक्कम वाहतुकीवर लक्ष केंद्रित केले आहे.

या महत्त्वपूर्ण कारवाईसाठी पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली अपर पोलीस अधीक्षक रिना जनबंधु यांच्या देखरेखीखाली सहायक पोलीस अधीक्षक आणि उपविभागीय पोलीस अधिकारी वरोरा नयोमी साटम यांच्या नेतृत्वात वरोरा पोलिस आणि एफ.एस.टी. पथकाने परिश्रम घेतले.

या मोठ्या कारवाईमुळे मतदारांमध्ये सुरक्षिततेचा संदेश पोहोचला आहे. जिल्ह्यात पोलिसांनी उचललेल्या या कठोर पावलांमुळे निवडणुका पारदर्शक पद्धतीने पार पडतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. अवैध रोकड वाहतुकीवर कडक कारवाई केली जात असल्याने मतदारांवर कोणताही अवैध प्रभाव पडू नये, असा प्रशासनाचा प्रयत्न आहे.

जप्त झालेल्या ७५ लाख रुपयांच्या रोकड बाबत पुढील तपास आता आयकर विभागाच्या ताब्यात आहे. पोलिसांनी तातडीने घेतलेल्या या पावलांमुळे अवैध रोकड वाहतूक करणाऱ्यांवर नियंत्रण ठेवण्यास मदत होईल आणि निवडणूक प्रक्रियेची पारदर्शकता वाढेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

विधानसभा निवडणुकांमध्ये कोणताही गैरप्रकार होऊ नये यासाठी चंद्रपूर पोलिसांनी सर्वतोपरी प्रयत्न सुरू ठेवले आहेत. या कार्यवाहीमुळे पोलिसांची कडक नजर आणि तत्परता दिसून येत आहेविधानसभा निवडणुका २०२४: चंद्रपूर पोलिसांची मोठी कारवाई, वरोरा येथील नाकाबंदीमध्ये ७५ लाखांची रोकड जप्त❋

## ज्येष्ठ लेखिका प्रा.वीणा देव यांचे निधन

**पुणे । प्रतिनिधी**

मराठी साहित्य क्षेत्रातील ज्येष्ठ लेखिका आणि विद्यार्थीप्रिय प्राध्यापिका प्रा. वीणा देव (वय ७५) यांचे मंगळवारी अल्पशा आजाराने निधन झाले. लेखन, संकलन, संपादन अशा विविध साहित्यप्रकारांमध्ये त्यांनी लीलया कामगिरी बजावली असून, अभिवाचनाच्या माध्यमातून अभिजात साहित्याच्या प्रचार-प्रसारात मोलाचे योगदान दिले आहे. प्रसिद्ध मराठी साहित्यिक गो. नी. दांडेकर यांच्या त्या कन्या होत्या.

वीणा देव यांच्या निधनाने मराठी साहित्यविश्वात शोककळा पसरली आहे. त्यांच्या पश्चात प्रसिद्ध अभिनेत्री मृणाल कुलकर्णी यांच्यासह दोन मुली, जावई आणि नातवंडे असा परिवार आहे. गोनीदांच्या मार्गदर्शनाखाली वीणा देव यांना बालपणापासूनच मराठी भाषा आणि साहित्याचे संस्कार मिळाले.प्रा. वीणा देव यांनी पुण्याच्या शाहू मंदिर महाविद्यालयात ३२ वर्षे अध्यापन कार्य केले. विभागप्रमुख म्हणून त्या सेवानिवृत्त



झाल्या. मराठी कथा-कादंबऱ्यांची नाट्यरूपे या विषयावर प्रबंध सादर करून त्यांनी पीएच.डी. संपादन केली होती. त्यांच्या साहित्यिक कार्याने आणि विद्यार्थ्यांप्रती असलेल्या निष्ठेने त्या कायमच प्रेरणादायी राहतील.

## मतदार जनजागृती ऑनलाईन स्पर्धेत अंकिता शेंडे आणि सुरज मदनकर विजेते

### जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते धनादेश वितरण




**चंद्रपूर । प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, जिल्ह्यातील नागरिकांमध्ये मतदानाबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी जिल्हा प्रशासनाच्या वतीने डतएएझ (Systematic Voters' Education and Electoral Participation) उपक्रमांतर्गत विविध साप्ताहिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमांचा मुख्य उद्देश १८ वर्षांवरील पात्र मतदारांची नोंदणी करणे, अधिकाधिक मतदारांना मतदानासाठी प्रोत्साहित करणे व मतदान प्रक्रियेशी संबंधित महत्त्वपूर्ण माहिती जनतेपर्यंत पोहोचवणे हा आहे. या अंतर्गत घेण्यात आलेल्या स्पर्धेमध्ये ४ प्रश्नांची अचूक उत्तरे देऊन अंकिता देविदास शेंडे तर टॅगलाईन (आपल्या विकासात देऊ या योगदान...चला सर्वांनी करू या मतदान) स्पर्धेत सुरज शंकर मदनकर विजेते ठरले आहेत. जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांच्या हस्ते अंकिता शेंडे यांना ५ हजार व सुरज मदनकर यांना १० हजार रुपयांचा धनादेश देण्यात आला. यावेळी उपवनसंरक्षक श्वेता बोड्डू उपस्थित होत्या.एकूण पाच आठवड्यांमध्ये जिल्हा प्रशासनाने सदर उपक्रम राबविला असून यात सोमवार ते शनिवार इच्छुक नागरिक सहभागी होऊ शकतील आणि प्रत्येक रविवारी त्या आठवड्याचे निकाल जाहीर करण्यात येतील. याअंतर्गत २३ सप्टेंबर ते ३० ऑक्टोबर २०२४ पर्यंत प्रत्येक आठवड्यात विविध स्पर्धा आयोजित करण्यात आल्या. ज्यात गुगल फॉर्मद्वारे क्विझ, निबंध लेखन स्पर्धा, आणि मतदान प्रक्रियेवर आधारित व्हिडिओ तयार करण्याचे कार्यक्रम आहेत. सहभागी नागरिकांना लकी ड्रॉ द्वारे रोख व रोमांचक बक्षिसे दिले जातील. जिल्हा निवडणूक कार्यालयद्वारे बनवण्यात आलेल्या पुस्तिकाच्या आधारावर ही स्पर्धा घेण्यात येत आहे. उपक्रमांमध्ये सहभागी होण्यासाठी चंद्रपूर जिल्ह्याच्या नागरिकांनी, जिल्हाधिकारी कार्यालयाच्या किंवा जिल्हा परिषदेच्या अधिकृत संकेतस्थळाला भेट द्यावी. या वेबसाइटवर संबंधित साप्ताहिक स्पर्धांची माहिती व गुगल फॉर्म लिंक उपलब्ध आहे.

## दीड लाखांची दारू जप्त

## घोड नदीपात्रातील गावठी दारू अड्ड्यावर पोलिसांचा छापा

**शिरूर । प्रतिनिधी**

शिरूर तालुक्यातील कवठे येमाई परिसरातील घोड नदीपात्रात बेकायदा गावठी दारू अड्ड्यावर पोलिसांनी धाड टाकून मोठी कारवाई केली आहे. या कारवाईत अंदाजे १ लाख ५४ हजार रुपयांची गावठी दारू, दारू तयार करण्यासाठी लागणारे रसायन, ताडी, तसेच अन्य साहित्य जप्त करण्यात आले. या प्रकरणात अक्षय बाळू देवकर आणि सागर गणपत गंडगुळ (दोघे रा. कवठे येमाई, ता. शिरूर) या दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असल्याची माहिती शिरूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संदेश केंजळे यांनी दिली.




पोलीस निरीक्षक केंजळे यांच्या नेतृत्वाखाली हवालदार भवर, सांगळे, सुद्रिक, रावडे, सचिन भोई यांच्या पथकाने घोड नदीपात्रातील बेकायदा दारू अड्ड्यावर छापा मारला. कारवाईत सुमारे १ लाख ५४ हजार रुपयांची गावठी दारू, तयार करण्यासाठीचे रसायन आणि ताडीचे साहित्य जप्त करण्यात आले असून, ते जागेवरच नष्ट करण्यात आले आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक पंकज देशमुख, अतिरिक्त अधीक्षक रमेश चोपडे आणि उपविभागीय अधिकारी प्रशांत ढोले यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. पोलीस उपनिरीक्षक दिलीप पवार या प्रकरणाचा तपास करत आहेत.शिरूर परिसरातील बेकायदा गावठी दारू तयार करणाऱ्यांविरोधात कठोर पावले उचलली जातील, तसेच नागरिकांनी या प्रकाराची माहिती पोलिसांना द्यावी. माहिती देणाऱ्याचे नाव गोपनीय ठेवण्यात येईल, असे आवाहन पोलीस निरीक्षक केंजळे यांनी केले आहे.

## चंद्रपूर व राजुरा विधानसभा मतदारसंघासाठी निवडणूक निरीक्षक म्हणून आर.मुत्यालाराजू रेवू

### वन अकादमी येथे सकाळी ११ ते १२ या वेळेत नागरिकांच्या भेटीसाठी उपलब्ध

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील ७०- राजुरा विधानसभा मतदारसंघ व ७१-चंद्रपूर विधानसभा मतदारसंघाच्या निवडणुकीकरीता निवडणुक निरीक्षक म्हणून आर. मुत्यालाराजु रेवु ( Shri. R. Mutyalaraju Revu) यांची भारत निवडणुक आयोगाने नियुक्ती केली आहे. ते २००७ बॅचचे भारतीय प्रशासकीय सेवेतील (I.A.S.) अधिकारी आहेत. निवडणूक कालावधीत त्यांच्या निवासाचा पत्ता 'पांगारा' कक्ष, वन अकादमी, मुल रोड, चंद्रपुर येथे असून त्यांच्या संपर्कासाठी ९४०५६७११४७ हा मोबाईल क्रमांक आहे. तसेच चंद्रपूर व राजुरा मतदारसंघातील नागरीक व राजकीय पदाधिका-यांसाठी ते दररोज सकाळी ११ ते १२ या वेळेत वन अकादमी येथील 'पांगारा' कक्षात उपलब्ध असतील, असे चंद्रपूर आणि राजुराचे निवडणूक निर्णय अधिकारी यांनी कळविले आहे.



# सर्जनशील लोकप्रतिनिधी

**सर्वांना समानतेने वागवविण्याची ज्यांची जबाबदारी आहे तेच जातीपातीच्या आणि धर्माच्या बंधनात अडकणार असतील तर धर्मनिरपेक्षता कशी येणार. निवडणुका जातीविरहित व्हायच्या तर तेथेच जातीधर्माला विशेष महत्त्व दिले जाते. यामुळे गरीब आणि गरीबी यांच्या हिताचे रक्षण होउच शकत नाही. म्हणून लोकप्रतिनिधी निवडून देताना जातपात, धर्म बघण्यापेक्षा गरीबांना न्याय देण्यासाठी झटणाऱ्यांचा विचार केला पाहिजे.**

आपला भारत विविध जातीप्रधान देश आहे. इथे गुणवत्तेपेक्षा जातीपातीला जास्त महत्त्व आहे की काय असे निवडणुका आल्या की दिसून येते. एकीकडे आम्ही भारत धर्मनिरपेक्ष राष्ट्र आहे म्हणून अभिमानाने सांगतो आणि दुसरीकडे शासकीय कागदपत्रांवर जातीचा उल्लेख करणे अनिवार्य करतो. आम्ही जाती तोडायला निघालो की जोडायला? हा प्रश्न या निमित्ताने उपस्थित होतो. पूर्वीच्या काळी जितके जातीपातीला महत्त्व द्यायचे अलीकडे ते युवापिढी देताना दिसत नाही. सर्वत्र शिक्षणाचा प्रचार आणि प्रसार झाल्यामुळे शिक्षण घेताना अनेकांच्या डोक्यात जात हा विषयच नसतो. विद्यार्थी जीवनात सर्वांनी जात–पात, धर्म विसरून एकमेकांशी गुण्यागोविंदाने वागायचे असते. युवा वयच असे आहे की जसे त्यांच्यावर संस्कार होईल त्याप्रमाणे ते घडत जाते. सामाजिक बांधिलकी आणि राष्ट्रवाद हा हेतू समोर ठेवून शिक्षण दिले जाते. त्याप्रमाणे शैक्षणिक धोरणांची आखणी केली जाते. परंतु शासकीय धोरणे लक्षात घेता असे वाटते की, ज्यांना जात विसरायची आहे त्यांनाही जोरजबरदस्तीने जात आठवायला लागावी अशी परिस्थिती निर्माण केली जाते. कागदपत्रांवर जातीपातीला आवश्यकतेपेक्षा जास्त महत्त्व देतात. एकीकडे जात–पात विसरा असे सांगायचे आणि दुसरीकडे जाती व्यवस्था सुदृढ राहण्यासाठी वातावरण निर्माण करायचे असे राजकीय पक्षांचे धोरण दिसतंय. शासकीय धोरणे बघता यातून शासनाचा दोगलेपण लक्षात येतो. विशेषतः निवडणूका आल्या की सर्वत्र जातीपातीच्या भिंती उभारल्या जातात. उमेदवार उभे करताना मतदारसंघांमध्ये ज्या जातीचे प्राबल्य असेल ज्या जातीची संख्या मोठ्या प्रमाणावर आहे. त्या जातीच्या उमेदवाराला राजकीय पक्ष आपल्या पक्षाची उमेदवारी जाहीर करीत असतात.अप्रत्यक्षपणे जातीयवादाला चालना दिली जाते.जर असेच चालत राहिले तर छोट्या जातीच्या लोकांनी काय करायचे? देशाच्या भवितव्याची धुरा ज्या राजकारण्याच्या हातांमध्ये आहे हे राजकारणीच जर असे जातीपातीला महत्त्व देणार असतील तर त्या देशाचे भवितव्य काय? एकीकडे मानव चंद्रावर गेला. आपली भौतिक प्रगती झाली. हजारो नव्हे तर लाखो किलोमीटर अंतरावरील माणसे एकमेकांशी क्षणात संपर्क साधू शकतात. बोलू शकतात. एकप्रकारे विश्वधर्म वृद्धिंगत होत चालला आहे. माणसे जातीच्याच नव्हे तर देशाच्या सीमारेषा ओलांडून इतर देशांशी सुसंवाद साधत आहे. हातात हात घालून परस्परांच्या सहकार्याने प्रगतीच्या आणि विकासाच्या दिशेने झेप घेण्याचा प्रयत्न केला जात आहे. सार जग अगदी जवळ आलं आहे. विश्वधर्म जोडला जात आहे.दुसरीकडे आमचे राजकारणी स्वयंकेंद्री होऊन जातीपातीच्या भिंती रूदावून आपले उखळ पांढरे करून घेत आहेत. स्वतःच्या स्वार्थासाठी लोकांना जातीपातीच्या बंधनात अडकवून ठेवले जात आहे.अतिशय लज्जास्पद आहे. निवडणुका गुणवत्तेच्या जोरावर लढल्या पाहिजे, परंतु दुर्दैवाने तसे होताना दिसत नाही. आपल्याकडे गुणवत्तेपेक्षा, लोकोपयोगी बाजू लक्षात घेण्यापेक्षा




जातपात आणि धनाढ्य, पैसेवाल्यांना महत्त्व आले आहे. असे जर पुढे सुरू राहिले तर पुढे सर्वसामान्य माणसाला, गरिबांना, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना लोकप्रतिनिधी म्हणून कधीच पुढे येता येणार नाही. अल्पसंख्याकांचे राजकारणात टिकणे कठीण जाईल. जातपात विसरून तरुण तत्ववादी भूमिका घेऊन निर्णायक मतदान करू शकतात. परंतु राजकीय मंडळी या कोवळ्या मनांवर जातीचे धर्माचे विषाणू सोडून वातावरण दुषित करतात . त्यामुळे लोकशाही असूनही निकोप मतदार व सर्जनशील नागरिक निर्माण होऊ शकत नाही. पुस्तकातले शिक्षण पुस्तकातच बंदिस्त राहते. विद्यार्थी जीवनातील कोवळ्या वयातच जर हे जातीपातीचे संस्कार होणार असेल तर पुढे कसे होईल. जाती–पाती पेक्षा कर्म महत्त्वाचे आहे. माणसाने कुठल्या जातीत जन्म घ्यावा हे आपल्या हातात नाही. मात्र कर्म करणे आपल्या हातामध्ये आहे. म्हणून लोकहितार्थ जगण्याचा दावा करणाऱ्यांनी व शासन, प्रशासनाने जातीपातीपेक्षा गुणवत्तेला महत्त्व देणे अपेक्षित आहे. तेच निकोप लोकशाही आणि मानवतेचे लक्षण आहे. परंतु दुर्दैवाने आपल्याकडे असे होताना दिसत नाही. निरक्षर लोकांपेक्षा शिकले सवरले लोकच जास्त जातीयवादी असतात असे निरीक्षण आहे. स्वतःचे उखळ पांढरे करण्यासाठी व स्वार्थ साधण्यासाठी जातीयवाद हे राजकारणी लोकांनी रचलेले षडयंत्र आहे . देशप्रेमी सर्वसामान्य समाजप्रेमी नागरिकांनी समजून घ्यायला पाहिजे. निदान युवा पिढीने तरी त्यांच्या या घाणेरड्या डावपेचाला बळी पडायला नको. निकोप लोकशाही जर टिकवायची असेल तर आता युवा पिढीला समोर आल्याशिवाय पर्याय नाही. युवकांनी राजकारणी लोकांचे धूर्त हेतू ओळखले पाहिजे. आपली लोकशाही बळकट करण्यासाठी धनाढ्य, गब्बर यांना निवडून देण्यापेक्षा ज्यांच्यामध्ये गुणवत्ता आहे अशा कर्तृत्ववान लोकांना निवडून दिले पाहिजे. उमेदवार गरीब असला तरी चालेल पण गुणवत्ता आहे अशा लोकांना निवडून देणे आपले आद्य कर्तव्ये आहे. केवळ पैशाच्या जोरावर श्रीमंतच जर सभागृहात जाणार असेल तर लोकशाही खऱ्या अर्थाने टिकणार नाही. हे लोक श्रीमंतांच्याच हिताचा विचार करेल.गरीबांचा कधीही विचार करणार नाही. भविष्यात स्थानिक स्वराज्य संस्थांपासून देशपातळीवर सगळे गब्बर श्रीमंत लोकच जाऊन बसतील. गरीब अधिक गरीब व श्रीमंत अधिक श्रीमंत होत जातील, गरिबांचा वाली कोणीही उरणार नाही? लक्षात ठेवा. गरिबांचा विचार गरीबच करू शकतो. श्रीमंत करू शकत नाही. युवकांनी गरिबांच्या बाजूने उभे राहायचे की श्रीमंताच्या याचा विचार केला पाहिजे. देशातील अलीकडे महागाई बघता गरिबांचे जिणे दुष्कर होऊन गेले आहे. एकीकडे आपण महागाईच्या नावाने रोष व्यक्त करतो आणि दुसरीकडे त्या महागाईचा पुरस्कार करणाऱ्या व्यवस्थेचे समर्थन करतो. असेच जर चालत राहिले तर महागाईचा वनवा पेटल्याशिवाय राहणार नाही. हा वनवा एक दिवस गरिबांना गिळून टाकेल. महागाईच्या जमान्यात सर्वसामान्य माणसांचे जगणे दुष्कर होऊन जाईल. भविष्य अंधकारमय होईल. उदाहरणार्थ साधा गॅस सिलेंडर घ्यायचा म्हटलं तरी घरच्या माणसाला दहादा विचार करावा लागतो. गरिबांच्या प्राथमिक गरजांचे भाव तरी नियंत्रणात असायला पाहिजे. लोकप्रतिनिधींना गरीबीची जाण असणे आवश्यक आहे. तुमचे नेतृत्व श्रीमंत असेल तर त्यांना गरिबाची जाणीव काय असणार?

# लोकशाही जीवंत हिच राष्ट्रीय एकात्मता

देशात दरवर्षी ३१ ऑक्टोबर रोजी 'राष्ट्रीय एकता दिवस' म्हणून साजरा केला जातो. सरदार वल्लभभाई पटेल यांच्या वारशाचा सन्मान करण्यासाठी भारत सरकारने २०१४ मध्ये अधिकृतपणे 'राष्ट्रीय एकात्मता दिवसा'ची घोषणा केली. भारताच्या राजकीय एकात्मतेत महत्त्वाची भूमिका बजावलेल्या भारताचे माजी उपपंतप्रधान सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त हा दिवस साजरा केला जातो. सरदार वल्लभभाई पटेल यांचा भारतातील विविध समुदायांच्या एकतेवर दृढ विश्वास होता. स्वातंत्र्यानंतर संस्थानांना भारतीय संघराज्यात समाकलित करण्याचे आव्हानात्मक कार्य त्यांनी पेलले. या राज्यांना सामील होण्यासाठी त्यांच्या मुत्सद्दी कौशल्ये आणि मुत्सद्देगिरीने महत्त्वाची भूमिका बजावली, ज्यामुळे देशाची प्रादेशिक अखंडता सुनिश्चित झाली. अखेर पटेल यांच्या अथक प्रयत्नांनी अखंड आणि सामंजस्यपूर्ण भारताचा पाया घातला. ५५० हून अधिक संस्थानांचे देशात विलीनीकरण करण्याच्या त्यांच्या अतुलनीय कामगिरीचा गौरव करण्यासाठी हा दिवस 'राष्ट्रीय एकता दिवस' किंवा 'राष्ट्रीय एकात्मता दिवस' म्हणून साजरा केला जातो.

भारतासारख्या वैविध्यतेने परिपूर्ण अशा देशात तेथील लोकांमधील एकता अत्यंत महत्त्वाची आहे. ज्यावेळी अनेक संस्थानांचे तुकडे झाले होते, त्यावेळी सरदार वल्लभभाई पटेल यांनी अखंड भारताच्या संकल्पनेचे समर्थन केले. त्यामुळे हा दिवस वल्लभभाई पटेल आणि इतर कार्यकर्त्यांनी देशाला जोडण्यासाठी केलेल्या संघर्ष आणि बलिदानाच्या स्मरणार्थ साजरा केला जातो. विविधतेत एकता च्या भावनेला प्रोत्साहन देऊन राष्ट्रीय अखंडता राखण्याला महत्त्व देणारा हा दिवस आहे. अखंड आणि सशक्त भारताचे कट्टर समर्थक असणार्या सरदार वल्लभभाई पटेल यांच्या कार्याच्या सन्मानार्थ हा दिवस त्यांचा वाढदिवसाचे अवचित्य साधून 'राष्ट्रीय एकता दिवस' म्हणून भारत सरकारने जाहीर केला. भारताच्या गृह मंत्रालयाने राष्ट्रीय एकता दिवसासाठी दिलेल्या अधिकृत निवेदनात असे नमूद केले आहे की राष्ट्रीय एकता दिवस एकता, अखंडतेसाठी आणि संभाव्य धोक्यांना तोंड देण्यासाठी आपल्या देशाच्या अंतर्निहित शक्ती आणि लवचिकतेची पुन्हा पुष्टी करण्याची संधी देईल. आपल्या देशाची सुरक्षा. त्या दिवशी, सरकारी कार्यालयांमध्ये एक प्रतिज्ञा वाचली जाते.



प्रविण बागडे
नागपूर
९९२३६२०९१९

मी शपथ घेतो की, मी देशाची एकता, अखंडता आणि सुरक्षितता जपण्यासाठी स्वतःला समर्पित करीन आणि माझ्या देशबांधवांमध्ये हा संदेश पोहोचवण्याचा प्रयत्न करेन. सरदार वल्लभभाई पटेल यांच्या दूरदृष्टी आणि कृतीमुळे शक्य झालेल्या माझ्या देशाच्या एकीकरणाच्या भावनेने मी ही शपथ घेत आहे. मी माझ्या देशाची अंतर्गत सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी माझे स्वतःचे योगदान देण्याचा संकल्प करतो. इंदिरा गांधी यांच्या हत्येचा दिवस म्हणून ३१ ऑक्टोबर हा दिवस राष्ट्रीय संकल्प दिवस किंवा राष्ट्रीय प्रतिज्ञा दिन म्हणूनही साजरा केला जातो. अनेक शाळा आणि महाविद्यालये, विशेषत: काँग्रेस संचालित राज्यांमध्ये, इंदिरा गांधींच्या स्मरणार्थ रॅली आणि कार्यक्रम आयोजित करतात. २०१८ मध्ये सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १४३ व्या जयंतीनिमित्त्य पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुजरातमधील नर्मदा नदीजवळ स्थित भव्य स्टॅच्यू ऑफ युनिटीचे उद्घाटन केले. एक भारत, श्रेष्ठ भारत ही पटेल यांची प्रसिद्ध घोषणा आजही राष्ट्राला प्रेरणा देते.

आयर्न मॅन ऑफ इंडिया म्हणून ओळखले जाणारे जगप्रसिद्ध नाव म्हणजे सरदार वल्लभभाई पटेल. अनेक भारतीय संस्थानांचे देशात विलीनीकरण करण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. ज्यामध्ये हैदराबादसह इतर संस्थानांचाही समावेश आहे. सरदार वल्लभभाई पटेल हे केवळ स्वातंत्र्यसैनिकच नव्हते तर दूरदृष्टी असलेले नेतेही होते. ३१ ऑक्टोबर १८७५ रोजी गुजरातमध्ये जन्मलेले पटेल हे एक समर्पित वकील होते. ते सदैव न्याय, समता आणि एकता यांच्या बाजूने उभे राहिले. भारतीय राज्यघटनेच्या निर्मितीतही त्यांचे योगदान होते. कारण त्यांनी संविधान सभेचे प्रमुख सदस्य म्हणून काम केले आणि संविधानाचा मसुदा तयार करण्यासाठी जबाबदार असलेल्या समितीचे अध्यक्षपदही भूषवले होते. सर्वांना आज त्यांच्या जयंतीनिमित्त 'राष्ट्रीय एकता दिना' च्या हार्दिक शुभेच्छा.

# औसा विधानसभेसाठी ओबीसीचे उमेदवार आकाश पुजारी यांचा उमेदवारी अर्ज दाखल



**आज शपथ घेऊन मी औसा मतदारसंघातील सर्व शेतकरी, कष्टकरी, वंचित आणि बहुजन समाजासाठी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. निवडून आल्यावर औसाचा नक्कीच कायापालट करेन. औसाकरांनी मला संधी दिल्यास, औसा हा देशातील सर्वांत समृद्ध मतदारसंघ करून दाखवेन आणि देशपातळीवर औसाची उंची वाढवणार आहे.**
**आकाश पुजारी, न्यू राष्ट्रीय समाज पार्टी, औसा विधानसभा**

**पुणे । प्रतिनिधी**

औसा विधानसभेच्या ओबीसी समाजातून नेतृत्व निर्माण करणारे न्यू राष्ट्रीय समाज पार्टीचे उमेदवार आकाश पुजारी यांनी आज औसा मतदारसंघासाठी उमेदवारी अर्ज दाखल केला. ओबीसी चळवळीतील सक्रियतेतून पुढे आलेले पुजारी यांचे अर्ज दाखल झाल्याने प्रस्थापित राजकीय पक्षांच्या गोटात चांगलीच खळबळ उडाली आहे. औसा मतदारसंघात सध्या आकाश पुजारी यांची उमेदवारी मोठ्या प्रमाणात चर्चेत आहे. या निवडणुकीत महायुतीचे अभिमन्यू पवार आणि न्यू राष्ट्रीय समाज पार्टीचे आकाश पुजारी यांच्यात काट्याची लढत होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. औसा मतदारसंघातील निवडणूक कोण जिंकणार याकडे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे.

# शेवटच्या दिवशी जिल्ह्यात १०५ उमेदवारांचे नामांकन अर्ज दाखल

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी आज शेवटच्या दिवशी (दि.२९) चंद्रपूर जिल्ह्यातील सहा विधानसभा मतदारसंघात एकूण १०५उमेदवारांनी नामांकन अर्ज दाखल केले.



७०– राजुरा विधानसभा मतदारसंघात निनाद चंद्रप्रकाश बोरकर (अपक्ष), रेशमा गणपत चव्हाण (जनवादी पार्टी), भूषण मधुकरराव फुसे (अपक्ष), प्रवीण रामदास सातपाडे (अपक्ष), देवराव विठोबा भोंगळे ( भारतीय जनता पार्टी), मंगेश हिरामण गेडाम (रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया), प्रवीण रामराव कुमरे (बहुजन मुक्ती पार्टी), गजानन गोदरु जुमनाके (गोडवाना गणतंत्र पार्टी), अरुण रामचंद्र धोटे (भारतीय राष्ट्रीय कांग्रेस), वामनराव सदाशिव चटप (स्वतंत्र भारत पक्ष), भूषण मधुकर फुसे (संभाजी ब्रिगेड), किरण गंगाधर गेडाम (अपक्ष), चित्रलेखा कालिदास धंदरे (अपक्ष), अभय मारोती डोंगरे (बहुजन समाज पक्ष), सचिन बापूराव भोयर (महाराष्ट्र नवनिर्माण सेना) आणि वामन उद्धवजी आत्राम (अपक्ष) यांनी नामांकन अर्ज दाखल केले.

७१ – चंद्रपूर विधानसभा मतदारसंघात विनोद कवडुजी खोब्रागडे (अपक्ष), प्रकाश शंकर रामटेके (बहुजन मुक्ती पार्टी), प्रविण नानाजी पडवेकर (भारतीय राष्ट्रीय काँग्रेस), मनोज गोपीचंद लाडे (बहुजन समाज पक्ष), प्रकाश उध्दवराव ताकसांडे (अपक्ष), किशोर गजानन जोरगेवार (भारतीय जनता पार्टी), ब्रिजभुषण महादेव पाझारे (अपक्ष), कोमल किशोर जोरगेवार (अपक्ष), मोरेश्वर कोदुजी बडोले (अपक्ष), राजु चिन्नया झोडे (अपक्ष), ङ विशाल शामराव रंगारी (बहुजन रिपब्लीक सोशालिस्ट पार्टी), अरुण देविदास कांबळे (रिपब्लीक पार्टी ऑफ इंडिया (रिफारनिष्ठ), बबन रामदास कासवटे (अपक्ष), स्नेहल देवानंद रामटेके (वंचित बहुजन आघाडी), आशिष अशोक माशीरकर (अपक्ष), आनंद सुरेश इंगळे (अपक्ष), संजय निळकंठ गावंडे (अपक्ष), ज्ञानदेव भजन हुमणे (अपक्ष), देवानंद नामदेवराव लांडगे (अपक्ष व भारतीय राष्ट्रीय काँग्रेस), रतन प्रल्हाद गायकवाड (अपक्ष), प्रवर्तन देवराव आवळे (अपक्ष), भिमनवार संजय परशुराम (राष्ट्रीय समाज पक्ष), ड राहुल अरुण घोटेकर (अपक्ष), भावेश राजेश मातंगी (अपक्ष), महेश मारोतराव मेंढे (अपक्ष), प्रतिक विठल डोर्लीकर (ऑल इंडियन रिपब्लीक पार्टी), अशोक लक्ष्मणराव मस्के (अपक्ष) यांचा समावेश आहे.

७२– बल्लारपूर विधानसभा मतदारसंघात प्रकाश मुरलीधर पाटील (अपक्ष), रब्बानी याबुक सय्यद (अपक्ष), रावत संतोषसिंह चंदनसिंह (भारतीय राष्ट्रीय काँग्रेस), उमेश राजेश्वर शेंडे (पिपल्स पार्टी ऑफ इंडिया डेमोक्रॅटिक), मनोज धर्मा आत्राम (गोंडवाना गणतंत्र पार्टी), संजय मारोतराव घाटे (भारतीय राष्ट्रीय काँग्रेस आणि अपक्ष), सत्यपाल राधोजी कातकार (अपक्ष), गावतुरे छाया बंडू (अपक्ष), गावतुरे अनिता सुधाकर (अपक्ष), नरेंद्र शंकर सोनारकर (बहुजन समाज पार्टी), सचिन राजबहुरण रावत (अपक्ष), अभिलाषा राकेश गावतुरे (अपक्ष), राकेश नामदेवराव गावतुरे (अपक्ष), भारत सोमाजी थूलकर (ऑल इंडिया रिपब्लिकन पार्टी), संजय शंकर कन्नावार (राष्ट्रीय समाज पक्ष), सय्यद अफजल अली सय्यद आबिद अली (अपक्ष), संदीप अनिल गि–हे (अपक्ष), विरेंद्र भीमराव कांबळे (अपक्ष).

७३ – ब्रम्हपूरी विधानसभा मतदारसंघात चक्रधर पूनिराम मेश्राम (जन जनवादी पक्ष), चक्रधर दोनुजी जांभुळे (कृतीशील गणराज्य पार्टी), गुरुदेव डोपाजी भोपाये (अपक्ष), सुधाकर श्रीराम (अपक्ष), प्रशांत डांगे (रिपब्लिकन पक्ष खोरीपा), केवलरम पारधी (बहुजन समाज पार्टी), गोपाळ मेंढे (बीआरएसपी), रमेश मडावी (बहुजन समाज पार्टी), नारायण जांभुळे (स्वाभिमानी पक्ष), राहुल मेश्राम (वंचित बहुजन आघाडी), रमेश समर्थ (रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया – ए), प्रेमलाल मेश्राम (वंचित बहुजन आघाडी) आणि पराग साहरे (अपक्ष) यांनी नामांकन दाखल केले.

७४ – चिमूर विधानसभा मतदारसंघात योगेश नामदेवराव गोंनाडे (अपक्ष), निकेश प्रल्हाद रामटेके (अपक्ष), अमित हरिदास भीमटे (अपक्ष), नारायणराव दिनबाजी जांभुळे (अपक्ष), हेमंत सुखदेव उरकुडे (अपक्ष), राजेंद्र हरिचंद्र रामटेके (बहुजन समाज पार्टी), दांडेकर भाऊराव लक्ष्मण (अपक्ष), मडावी मनोज उद्धवराव, रमेश बाबुराव पचारे (अपक्ष), जितेंद्र मुरलीधर ठोंबरे (अपक्ष), केशव सिताराम रामटेके (अपक्ष).

७५ – वरोरा विधानसभा मतदारसंघात प्रवीण धोंडोजी सुर (मनसे), जयवंत नथुजी काकडे (बहुजन रिपब्लिकन सोशालिस्ट पार्टी), प्रवीण मनोहर खैरे (अपक्ष), नरेंद्र नानाजी जीवतोडे (अपक्ष), सुभाष जगन्नाथ ठेंगणे (अपक्ष), दिनेश दादाजी चोखारे (भारतीय राष्ट्रीय काँग्रेस आणि अपक्ष), करण संजय देवतळे (भाजपा), अतुल ईश्वर वानकर (अपक्ष), अनिल नारायण धानोरकर (वंचित बहुजन आघाडी आणि अपक्ष), चेतन गजानन खुटेमाटे (अपक्ष), सागर अनिल वरघणे (बहुजन समाज पक्ष), महेश पंढरिनाथ ठेंगणे (अपक्ष), रमेश कवडूजी मेश्राम (गोंडवाना गणतंत्र पार्टी आणि अपक्ष), नामदेव किसनाजी ढुमणे (अपक्ष), मुकेश मनोजराव जीवतोडे (अपक्ष), अंबर दौलतराव खानेकर ( राष्ट्रीय समाज पक्ष), सेवकदास कवडूजी बरके ( पीपल्स पार्टी ऑफ इंडिया (डेमोक्रेटिक), प्रवीण सुरेश काकडे (भारतीय राष्ट्रीय काँग्रेस), सुमितकुमार नामदेव चंद्रागडे (अपक्ष), तारा महादेवराव काळे (अपक्ष) यांनी आज नामांकन अर्ज दाखल केले.

विधानसभेसाठी २० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदान होणार आहे. उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत ४ नोव्हेंबर पर्यंत आहे.

# विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ऑल इंडिया स्टुडंट्स फेडरेशन ने प्रकाशित केला शिक्षणाचा विद्यार्थी जाहीरनामा

**भंडारा | प्रतिनिधी**

राज्यातील आगामी विधानसभा निवडणुकांमध्ये विद्यार्थ्यांच्या मुद्द्यांना प्राधान्य देण्यासाठी ऑल इंडिया स्टुडंट्स फेडरेशन ने शिक्षणासंदर्भातील विद्यार्थी जाहीरनामा प्रकाशित केला आहे. या जाहीरनाम्यात शिक्षणाच्या हितासाठी महाविकास आघाडीच्या सर्व घटक पक्षांना विद्यार्थ्यांच्या मागण्या समाविष्ट करण्याचा आग्रह करण्यात आला आहे. जाहीरनाम्याच्या प्रती भारतीय कम्युनिस्ट पक्ष , भारतीय राष्ट्रीय काँग्रेस , राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरद पवार गट), शिवसेना (उबाठा), आम आदमी पार्टी , शेकाप इत्यादींना देण्यात आल्या आहेत. यावेळी ऑल इंडिया स्टुडंट्स फेडरेशन चे राष्ट्रीय अध्यक्ष कॉम्रेड विराज, राज्याध्यक्ष



कॉम्रेड वैभव चोपकर, राज्यसचिव कॉम्रेड प्रतीक्षा ढोके, आणि सहसचिव आमिर काजी उपस्थित होते. ऑल इंडिया स्टुडंट्स फेडरेशन ने सांगितले की, यंदाची विधानसभा निवडणूक महाराष्ट्राच्या अस्मितेच्या संरक्षणासाठी अत्यंत महत्वाची आहे, ज्यामुळे राज्याचे भविष्य निश्चित होईल. गेल्या काही वर्षांत महाराष्ट्रातील सामाजिक सौहार्दावर गालबोट लावण्याचे प्रयत्न झाले आहेत. केंद्राचे भाड खाणाऱ्या राज्यपालांनी छत्रपती शिवरायांच्या पुतळ्याची विडंबना करून महामानवांचा अपमान केला आहे, तसेच धार्मिक व जातीय दंगलीत जनतेला झोकण्यात आले आहे.

राज्यातील उद्योग बाहेर पळवून लावण्यात आले असून, कामगार, शेतकरी, दलित, आदिवासी आणि अल्पसंख्यांक अशा सर्व दुर्बल घटकांचे जीवनमान धोक्यात आले आहे. शिंदे-मिंधे सरकारने मोदी-शाहचे मन राखण्यासाठी मुठभर लोकांना महाराष्ट्र विकण्याचे कृत्य केले आहे.

महायुतीच्या काळात शिक्षण क्षेत्रावर झालेले हल्ले सुनियोजित होते. राज्यातील हजारो सरकारी शाळा बंद करण्यात आल्या आणि शिक्षणाच्या खासगीकरणाची प्रक्रिया वेगाने राबविण्यात आली. ऑल इंडिया स्टुडंट्स फेडरेशन ने नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अंमलबजावणीला विरोध केला आहे, ज्यामुळे शिक्षणाचा संपूर्ण खेळखंडोबा होईल.

अशा परिस्थितीत, ऑल इंडिया स्टुडंट्स फेडरेशन ने महाविकास आघाडीच्या मुख्य जाहीरनाम्यात विद्यार्थ्यांच्या मागण्या समाविष्ट करण्याची अपेक्षा व्यक्त केली आहे. ऑल इंडिया स्टुडंट्स फेडरेशन च्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या न्याय्य मागण्यांचा समावेश असलेल्या विद्यार्थी जाहीरनाम्याला महाविकास आघाडीने मान्यता देणे आवश्यक आहे.

## पाण्याच्या टाक्या आहेत;पण पाण्याचा थेंबही नाही
## वैजापूर तालुक्यातील गोळवाडीतील पाण्याच्या समस्या गंभीर

**छत्रपती संभाजीनगर | प्रतिनिधी**

वैजापूर तालुक्यातील गोळवाडी गावात पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. जुलै अखेरपासून पाण्याचा टँकर पुरवठा बंद झाला असून, त्यानंतर गावामध्ये पाण्याची काहीच व्यवस्था करण्यात आलेली नाही. ऑगस्ट, सप्टेंबर आणि ऑक्टोबर महिन्यातही गावातील प्रतिनिधी आणि ग्रामपंचायत प्रशासनाने या समस्येवर कोणतीही ठोस कारवाई केलेली नाही.

गावासाठी बोर दहेगाव येथून पाणी पुरवठ्यासाठी पाईपलाईन उभारण्यात आली असली, तरी ती फक्त दिखावा ठरली आहे. चालू केल्यावरही या पाईपलाईनमधून पाणी वाया जाते; मात्र याकडे कोणाचेही लक्ष नाही. गावातील हातपंपांवर अतिक्रमण झाल्यामुळे स्थानिक ग्रामस्थांना पिण्याच्या





पाण्याची सध्या मोठी समस्या भेडसावत आहे. हातपंपांवर काहींनी स्वतःचे ताबे घेतले असून, त्यात बोरचे पाणी मोटारीने उपसले जाते, मात्र सार्वजनिक वापरासाठी पाण्याची सोय नाही. ग्रामपंचायत प्रतिनिधींनी यावर कोणतीही कारवाई न केल्याने, गावातील पाण्याचा प्रश्न अधिक गंभीर होत चालला आहे. त्यामुळे प्रशासनाने या पाण्याच्या समस्येकडे तातडीने लक्ष द्यावे, अशी मागणी गावकऱ्यांनी केली आहे.

## पीएम विश्वकर्मा योजनेच्या लाभार्थ्यांची बँकांनी अडवणूक थांबवावी यासाठी जिल्हाधिकारी यांना निवेदन

**बीड | प्रतिनिधी**

केंद्र शासनाने १८ पगड जाती व १२ बलुतेदारांसाठी सुरू केलेल्या पीएम विश्वकर्मा योजनेचा उद्देश पारंपारिक व्यवसायांना आधुनिकतेकडे जाण्यासाठी आर्थिक पाठबळ देणे आहे. या योजनेच्या अंतर्गत महाराष्ट्रात पीएम विश्वकर्मा प्रशिक्षण केंद्रे कार्यरत असून बीड जिल्ह्यातही यशस्वीरित्या चालू आहेत.

प्रशिक्षण घेतलेल्या प्रशिक्षणार्थ्यांना बँकेच्या कर्जासाठी पात्र ठरवले असून, तरीही काही बँक अधिकारी विनाकारण कारणे सांगून लाभार्थ्यांना त्यांच्या हक्कापासून वंचित ठेवत आहेत. विविध



नियम आणि अटी सांगून त्यांच्या कर्ज प्रकरणांचा नकार दिला जात आहे.

या गंभीर समस्येसंबंधी महाराष्ट्र नाभिक महामंडळाचे जिल्हाध्यक्ष विशाल वाघमारे यांनी जिल्हाधिकारी यांची भेट घेऊन त्यांच्या सोबत चर्चा केली आणि एक निवेदन सादर केले. यावेळी त्यांनी बँकांनी अडवणूक थांबवून लाभार्थ्यांना हक्काचे कर्ज देण्याची मागणी केली.

जिल्हाधिकारी यांनी लवकरच यावर मार्ग काढला जाईल असे आश्वासन दिले. या वेळी जिल्हाध्यक्ष विशाल वाघमारे, बीड तालुका अध्यक्ष आकाश सपकाळ, बीड शहराध्यक्ष अक्षय जाधव, शामराव राऊत, अशोक वैद्य आणि इतर समाज बांधव उपस्थित होते. सामाजिक व आर्थिक न्याय सुनिश्चित करण्यासाठी या समस्येवर तात्काळ उपाययोजना करणे आवश्यक आहे.





**आज नागभीड मध्ये अर्धा तास गडगडाट होऊन मुसळधार पाऊस आल्यामुळे वाहतूक काही वेळ विस्कळीत झाली.छाया :प्रणय बांगरे.**

## डॉ.अभिलाषा ताई गावतुरे यांनी ७२ बल्लारपूर विधानसभा मतदारसंघातून अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला

**मूल | प्रतिनिधी**

७२ बल्लारपूर विधानसभा मतदारसंघातील उमेदवारीचे चित्र आज स्पष्ट झाले, ज्यात डॉक्टर अभिलाषा ताई गावतुरे यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला. गेल्या दहा दिवसांपासून या मतदारसंघातील काँग्रेसच्या तिकीटासाठी जोरदार रस्सीखेच सुरू होता. शिक्षित, सक्षम महिला ओबीसी उमेदवार म्हणून डॉक्टर गावतुरे यांचे नाव आघाडीवर होते, आणि त्यांनी सामाजिक क्षेत्रात गेल्या दहा-पंधरा वर्षांपासून मोठे कार्य केले आहे.

अध्यक्षीय निवडणुकीत, त्यांनी काँग्रेसच्या उमेदवार प्रतिभाताई धानोरकरसाठी प्रचंड मेहनत घेतली होती. त्यामुळे, डॉक्टर गावतुरे यांना काँग्रेसचे तिकीट मिळाल्यास



विद्यमान पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांना निवडणुकीत कडवी स्पर्धा भासेल, अशी चर्चा होती.

काँग्रेसमध्ये मागासवर्गीयांना प्रतिनिधीत्व देण्याचे धोरण लागू करण्याच्या राहुल गांधींच्या प्रयत्नामुळे डॉक्टर गावतुरे यांना तिकीट मिळेल, अशी अपेक्षा होती. मात्र, काँग्रेसमधील गटातटाच्या राजकारणामुळे संतोष सिंग रावत यांना उमेदवारी दिली गेली. यानंतर डॉक्टर गावतुरे यांचे पुढील पाऊल काय असणार याकडे सर्वांचे लक्ष लागले होते.

आज डॉक्टर अभिलाषा गावतुरे यांनी मुल येथील तहसील कार्यालयात अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला. गेल्या तीन दशकांपासून मतदारसंघातील समस्यांवर कोणीही लक्ष दिलेले नाही. त्यामुळे, आम्ही आमची उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. मतदार आम्हाला भरघोस प्रतिसाद देतील,असे डॉक्टर गावतुरे यांनी सांगितले.

या निर्णयामुळे मतदारसंघात नव्या राजकीय स्थितीत उभी झालेली आहे, आणि त्यांच्या उमेदवारीमुळे आगामी निवडणुकांच्या चुरशीच्या वातावरणात वाढ होण्याची अपेक्षा आहे.

## शेतमजुरांना घेऊन जाणाऱ्या ट्रॅक्टरला अपघात; दोन महिला ठार, १३ गंभीर जखमी

**मलकापूर | प्रतिनिधी**

नांदुरा-मलकापूर रस्त्यावर वडी गावाजवळ आज (२९ ऑक्टोबर )सकाळी घडलेल्या भीषण अपघातात दोन महिला शेतमजुरांचा मृत्यू झाला असून १३ महिला गंभीर जखमी झाल्या आहेत. सकाळी ५:४५ वाजताच्या सुमारास राष्ट्रीय महामार्गावर हा अपघात घडला.

सध्या शेतांमध्ये सोयाबीन काढणी, मका सोंगणी आणि कापूस वेचणीचा हंगाम सुरू असल्याने शेतमजूर पहाटेच कामावर जात असतात. नायगाव येथे कामासाठी जात असलेल्या वडी गावातील महिला शेतमजुरांना घेण्यासाठी ट्रॅक्टर (क्रमांक एम एच २८ ए



झेड ७०१७) सकाळी वडी येथे थांबले होते. या महिला शेतमजूर ट्रॅक्टरच्या ट्रॉलीत चढत असतानाच नांदुरा बाजूकडून मलकापूरकडे जाणाऱ्या एका अज्ञात ट्रकने ट्रॅक्टरला मागून जोरदार धडक दिली.

अपघातात दोन महिला जागीच ठार झाल्या, तर अन्य १३ महिला गंभीर जखमी झाल्या आहेत. धडक एवढी जोरदार होती की ट्रॉलीतील शेतमजुरांना गंभीर दुखापती झाल्या. जखमींना तात्काळ जवळच्या रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.

## पाथरी विधानसभा मतदारसंघात राष्ट्रवादीचे बाबाजानी दुर्राणी यांचा शक्तिप्रदर्शनासह उमेदवारी अर्ज दाखल
### महाविकास आघाडीत मोठा पेचप्रसंग

**पाथरी | प्रतिनिधी**

पाथरी विधानसभा मतदारसंघातून राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाकडून अधिकृत उमेदवार म्हणून बाबाजानी दुर्राणी यांनी उमेदवारी अर्ज दाखल करताच महाविकास आघाडीत मोठी खळबळ उडाली आहे. काँग्रेसचे विद्यमान आमदार सुरेश वरपुडकर यांना महाविकास आघाडीतून उमेदवारी मिळाल्याने, आघाडीत गंभीर पेचप्रसंग निर्माण झाला आहे.

सुरुवातीला दुर्राणी यांनी अपक्ष उमेदवार म्हणून अर्ज दाखल केल्याने हा दबावतंत्राचा भाग तर नाही ना, अशी चर्चा राजकीय वर्तुळात रंगली होती. मात्र, त्यांनी



राष्ट्रवादीच्या वरिष्ठ नेते शरद पवार यांच्याकडे संपर्क साधून आपली अधिकृत उमेदवारीची इच्छा व्यक्त केली. त्यानुसार पक्षश्रेष्ठींनी त्यांना एबी फॉर्म बहाल केल्यानंतर मंगळवारी पाथरी तहसील कार्यालयात दुर्राणी यांनी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने उमेदवारी अर्ज दाखल केला.

या घटनेमुळे पाथरी मतदारसंघात महाविकास आघाडीत मोठी फूट पडली असून काँग्रेस आणि राष्ट्रवादीचे उमेदवार समोरासमोर आले आहेत. या प्रतिस्पर्धी लढतीचा परिणाम आगामी निवडणुकीवर होणार असून, अंतिम क्षणी दोघांपैकी एक जण माघार घेणार का, हे पाहणे उत्सुकतेचे ठरणार आहे.

# अभिषेक सामाजिक संस्थेच्या वतीने आदिवासी बांधवांना मोफत रेशन वाटप कार्यक्रम संपन्न

**बीड | प्रतिनिधी**

दिवाळी हा सण प्रत्येकजण आपल्या कुटुंबासोबत साजरा करतो; परंतु काही सामाजिक संस्था आपल्या बांधिलकीच्या भावना प्रकट करत, जिनांच्याकडे साजरे करण्यासारखे काही नसते, अशा आदिवासी बांधवांसोबत या सणाचे महत्त्व उभारीत आहेत. अभिषेक शैक्षणिक सामाजिक संस्थेने दरवर्षीप्रमाणे यंदा देखील आदिवासी बांधवांसाठी दिवाळी फराळासाठी लागणारे रेशन, कपडे व फटाके यांचे वाटप केले. गोरेगाव पूर्व येथील नवसाचा पाडा येथील शंभर आदिवासी बांधवांना या उपक्रमांतर्गत रेशन वितरित करण्यात आले, ज्यामध्ये रवा, मैदा, साखर, तांदूळ, चिवडा आणि पोहे यांचा समावेश होता.या उपक्रमात अभिषेक शैक्षणिक सामाजिक संस्थेच्या वतीने विविध संस्थांनीही सहभाग घेतला. नरसिंहराव पिंपळे ओम साई चॅरिटेबल ट्रस्ट, लोकशाहीर विठ्ठल उमप फाउंडेशन, ईपीएस वर्ड वाईड, गौरव चॅरिटेबल ट्रस्ट यांसारख्या सामाजिक कार्यकर्त्यांनी आदिवासी बांधवांच्या मदतीसाठी पुढे येत या उपक्रमाला समर्थन दिले.

दिवाळी फराळाच्या वाटपानुसार आदिवासी बांधवांना कपडे, खाऊ, फटाके यांचाही समावेश करण्यात आला. यावेळी लोकशाहीर नंदेश उमप आणि अभिषेक शैक्षणिक सामाजिक संस्थेच्या अध्यक्ष सुनीता नागरे यांनी आदिवासी बांधवांशी संवाद साधून त्यांच्या शैक्षणिक गरजांच्या बाबतीत सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

सुनीता नागरे यांनी या उपक्रमाच्या महत्त्वावर प्रकाश टाकताना म्हटले की, आम्ही आमच्या आदिवासी बांधवांसाठी दिवाळी साजरी करण्यासाठी रेशन वितरित करतो, ज्यामुळे कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीला दोन-चार दिवस फराळाचा आनंद घेता येईल.

यावेळी आदिवासी बांधवांना दिवाळीच्या शुभेच्छा देण्यात आल्या, आणि भविष्यातही त्यांच्या चेहऱ्यावर आनंद आणण्याचे आश्वासन दिले. नागरे यांनी या सामाजिक कार्यात सहभागी सर्वांचा आभार मानला आणि भविष्यातही आदिवासी बांधवांना सहकार्य करण्याची अपेक्षा व्यक्त केली.



# राहुरी विधानसभा मतदारसंघात महाविकास आघाडीचा उमेदवार प्राजक्त तनपुरे मैदानात; शरद पवार गटाचे शक्तिप्रदर्शन

**राहुरी । प्रतिनिधी**

राहुरी विधानसभा मतदारसंघात महाविकास आघाडीने शरद पवार गटाचे उमेदवार प्राजक्त तनपुरे यांना निवडणुकीच्या रिंगणात उतरवलं आहे. विद्यमान खासदार आणि जयंत पाटील यांचे भाचे असलेले प्राजक्त तनपुरे यांनी आज (२९ ऑक्टोबर ) तुतारी चिन्हावर उमेदवारी अर्ज दाखल केला.

उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी प्राजक्त तनपुरे यांनी राहुरीत मोठे शक्तिप्रदर्शन केले. यावेळी त्यांनी उपस्थित सर्वांचे आभार मानले आणि उत्साही जनतेच्या प्रतिसादामुळे विजय निश्चित असल्याचे म्हटले. पुढील १५-२० दिवस अविश्रांत परिश्रम घ्यायचे आहेत. गावोगावी जाऊन तुतारी वाजवणारा माणूस हे चिन्ह सर्वांपर्यंत पोहोचवा, असे त्यांनी आवाहन केले.

ते म्हणाले, मागील लोकसभेच्या निवडणुकीत गफलत झाली होती, त्यामुळे आता गफलत होऊ नये. ते म्हणाले की,पाच वर्ष तुम्ही सर्वांनी माझ्यावर विश्वास टाकला, त्याबद्दल मी ऋणी आहे. जनतेच्या दरबारात पुन्हा आशिर्वाद मागण्यासाठी उभा आहे. मागील १० वर्षांची आणि आताची ५ वर्षांची पाण्यासंदर्भात तुलना करा, आणि मगच मतदान करा.

प्राजक्त तनपुरे यांनी निळवंडे धरणाच्या संदर्भात आश्वासन दिले की,मागील लोकप्रतिनिधींनी केवळ आश्वासनं दिली, पण भरीव निधी दिला नाही. परंतु, मी दोन वर्षांत निळवंडे धरणाचं पाणी आणले आहे.

उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या कार्यक्रमात शरद पवार गटाचे जयंत पाटील यांनी जाहीर सभेला संबोधित करताना प्राजक्त तनपुरे यांचे गुण विशेषतः रेखांकित केले. प्राजक्तचे गुण राज्यातील सर्व नेत्यांनी पाहिलं आहे. त्यांच्यामुळेच निळवंडे धरणाचं पाणी राहुरीत आलं आहे,असे त्यांनी सांगितले.

जयंत पाटील यांनी जनतेला आवाहन केले की,एक नव्या कर्तबदार नेत्याला तुम्ही मत द्यावे. तो युवा नेता तुम्हाला विधानसभा मध्ये पाठवा, जो तुमच्या सर्वांच्या अपेक्षांना पूर्ण करेल.

राहुरी विधानसभा मतदारसंघात या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडी आणि प्राजक्त तनपुरे यांचा प्रचार उंचावला आहे, आणि त्यांच्या विजयाची आशा प्रज्वलित झाली आहे.



# देवळी विधानसभा मतदार संघातील उमेदवारांच्या निवडणूक खर्च तपासणी कार्यक्रमाची घोषणा

**वर्धा । प्रतिनिधी**

देवळी विधानसभा मतदार संघात आगामी विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर उमेदवारांना निवडणूक खर्चाच्या तपासणीसाठी माहिती सादर करणे अनिवार्य करण्यात आले आहे. उमेदवारीची निश्चिती झाल्यानंतर, उमेदवारांनी त्यांच्या निवडणूक खर्चाचे अभिलेख निर्धारित वेळेत निवडणूक विभागांना सादर करणे आवश्यक आहे.

देवळी विधानसभा मतदार संघाच्या निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी प्रियंका पवार यांनी उमेदवारांना आवाहन केले आहे की, त्यांनी खर्चाच्या तपासणीसाठी निश्चित वेळेत उपस्थित राहावे. या प्रक्रियेसाठी तयारी ठेवणे आवश्यक असून, यामुळे पारदर्शकतेचा आदर राखला जाईल.



तपासणीचा कार्यक्रम संपूर्ण निवडणूक प्रक्रियेसाठी अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. यामुळे निवडणूक खर्चाचे व्यवस्थापन योग्य रितीने होण्याची अपेक्षा आहे, ज्यामुळे लोकशाही प्रक्रियेतील विश्वासार्हता वाढेल

# गंगापूरमध्ये निवडणुकीचे वातावरण तापले प्रा.डॉ. सोनवणे प्रस्थापितांना देतात कडवी टिका

**गंगापूर । प्रतिनिधी**

गंगापूर खुलताबाद मतदारसंघातील अपक्ष उमेदवार आणि गरुड झेप अकॅडमीचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. सुरेश सोनवणे यांनी आज निवडणूक प्रचारात प्रस्थापितांना थेट आव्हान दिले. त्यांनी स्पष्ट केले की, गेल्या पंधरा वर्षांत या मतदारसंघात अपेक्षित विकास झालेला नाही, आणि मतदारांच्या आश्वासनांना महत्त्व देण्यात आलेले नाही.

प्रा. सोनवणे म्हणाले की, गंगापूर खुलताबादचा विकास होणे महत्त्वाचा होता, पण आजपर्यंत तो झाला नाही. या मतदारसंघात शिक्षण क्षेत्रात मोठे प्रश्न



अजूनही उभे आहेत. त्यांचा आरोप आहे की, निवडणुकांच्या काळात राजकीय नेत्यांनी लोकांना दिशाभूल करण्याचे काम केले आहे, पण त्यानंतर त्यांच्या आश्वासनांची कोणतीही पूर्तता झालेली नाही.

प्रा. सोनवणे यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले, रात्री बारा वाजता माझ्या मिटींग चालू आहेत, आणि जनतेतून मोठा प्रतिसाद मिळत आहे. युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होत नसल्यामुळे, मी आमदार झाल्यावर त्यांच्या प्रश्नासाठी नक्की पुढे येईल अशी आश्वासन दिली आहे.

युवकांच्या समस्या सोडवण्यासाठी त्यांची प्राथमिकता आहे, तसेच गंगापूरमधील पाण्याचा प्रश्न गंभीर असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. मला सतत धमक्याचे सत्र सुरूच आहे, पण मी कोणत्याही प्रकारचा घाबरून न जाता, काय ती लढत होईल,असे प्रा. सोनवणे म्हणाले.

ते म्हणाले,मी मतदार संघामध्ये बूथ बांधणी केली असून, माझे बूथ प्रमुख मोठ्या प्रमाणात मतदार ग्रामस्थांपर्यंत पोहोचत आहेत. यामुळे, निवडणुकीच्या तयारीत माझा आत्मविश्वास वाढला आहे.

प्रा. सोनवणे यांच्या या प्रतिक्रियांनी गंगापूरमध्ये निवडणुकीचे वातावरण आणखी तापले आहे, आणि त्यांची लढाई आता प्रस्थापितांच्या विरोधात एक महत्त्वपूर्ण टप्पा गाठेल का, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.

# २००० एसटी कर्मचाऱ्यांना हवा दिवाळी अग्रीम

**यवतमाळ । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळातील कर्मचाऱ्यांना दिवाळीनिमित्त १२,५०० रुपयांचा सण अग्रीम दिला जाणार आहे. यासाठी १८५७ कर्मचाऱ्यांनी अर्ज दाखल केला असून, त्यांना ही रक्कम मिळण्याची प्रतीक्षा आहे.

महामंडळाने जाहीर केले की, ज्या कर्मचाऱ्यांचे दरमहा मूळ वेतन ४३,७०० रुपयांच्या अधिक नाही, अशा कर्मचाऱ्यांना दिवाळी सणासाठी सण अग्रीम १०,५०० रुपये देण्यात येणार आहे. तसेच, मागील सणाचे थकीत पैसे असलेल्या, रोजंदारीवर काम करणाऱ्या व ज्यांची सेवानिवृत्ती दहा महिन्यांच्या आत आहे, अशा कर्मचाऱ्यांना या रकमेच्या वर्तमनात वगळण्यात आले आहे.

कर्मचाऱ्यांना सण अग्रीम म्हणून देण्यात आलेली रक्कम डिसेंबर २०२४ च्या वेतनातून दहा समान हप्त्यात वसूल केली जाणार आहे. याबाबतची सूचना कर्मचाऱ्यांना महामंडळाकडून पूर्वीच देण्यात आली होती. अर्ज दाखल केलेल्या कर्मचाऱ्यांना आता सण अग्रीमची प्रतीक्षा आहे, आणि ही रक्कम त्यांच्यासाठी दिवाळी सण साजरा करण्यास मदत करेल

# ५० हजारांहून अधिक रोकड बाळगताय? दिवाळीच्या खरेदीवेळी सावधान! पोलिसांची तपासणी सुरू

**वर्धा । प्रतिनिधी**

दिवाळीच्या सणानिमित्त खरेदीसाठी बाजारपेठेत येणाऱ्या नागरिकांनी ५० हजार रुपयांहून अधिक रोकड बाळगल्यास पोलिसांच्या तपासणीसाठी तयार रहावे, असे आवाहन पोलिसांनी केले आहे. विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर आचारसंहिता लागू असल्यामुळे आर्थिक उलाढालीवर पोलिस आणि प्रशासनाचे लक्ष आहे.



जिल्हाधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, मोठ्या रक्कमेसह प्रवास करणाऱ्या नागरिकांनी रोख रकमेचा स्रोत स्पष्ट करणारे दस्तऐवज बरोबर ठेवावेत. बँकेतून काढलेल्या रकमेचा पुरावा म्हणून पासबुक, दूध डेअरीचे पैसे असल्यास पावती ठेवणे आवश्यक आहे. तपासणी दरम्यान पुरावे नसेल तर रक्कम जप्त होऊ शकते आणि सुनावणी प्रक्रियेतील कायदेशीर कार्यवाहीस सामोरे जावे लागेल.

पोलिसांनी तालुक्यातील चार ठिकाणी तपासणी नाके उभारले आहेत, ज्यात वणी, मारेगाव आणि झरी तालुक्यांचा समावेश आहे. येथे सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात आले असून तपासणी प्रक्रियेच्या पारदर्शकतेला प्राधान्य देण्यात आले आहे. निवडणूक विभागाने नागरिकांना त्रास देण्याचा उद्देश नाही, परंतु शंका आल्यास कायदेशीर कार्यवाहीला सामोरे जावे लागेल, असे त्यांनी स्पष्ट केले आहे. त्यामुळे नागरिकांनी नियम समजून घ्यावे आणि खरेदीदरम्यान अधिकाधिक ऑनलाइन व्यवहार करण्याचा सल्ला दिला आहे.

# क्षेत्रीय अधिकारी, एसएसटी व एफएसटी प्रमुखांना विशेष कार्यकारी दंडाधिकाऱ्यांचे अधिकार

## महाराष्ट्र राजपत्रात अधिसुचना प्रसिध्द

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

महाराष्ट्र सार्वत्रिक निवडणूक - २०२४ करीता जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी यांनी नियुक्त केलेल्या क्षेत्रीय अधिका-यांना तसेच स्थायी निगराणी पथक (एसएसटी) आणि फिरते पथक (फ्लाईंग स्कॉड) प्रमुखांना विशेष कार्यकारी दंडाधिका-यांचे अधिकार देण्यात आले आहेत. याबाबतची अधिसुचना महाराष्ट्र राजपत्रात प्रकाशित झाली आहे.

निवडणूक प्रक्रियेकरीता नियुक्त करण्यात आलेल्या जिल्ह्यातील क्षेत्रीय अधिका-यांना १३ नोव्हेंबर ते २० नोव्हेंबर २०२४ या कालावधीसाठी विशेष कार्यकारी दंडाधिकारी तर स्थायी निगराणी पथक (एसएसटी) आणि फिरते पथक (फ्लाईंग स्कॉड) प्रमुखांना १५ ऑक्टोबर ते २५ नोव्हेंबर २०२४ या कालावधीकरीता विशेष कार्यकारी दंडाधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे. तसेच उपरोक्त अधिका-यांना आणि पथक प्रमुखांना भारतीय नागरिक सुरक्षा संहिता - २०२३ च्या कलम १४८, १५२, १६२ आणि १६३ अन्वये शक्ती प्रदान करण्यात आल्याचे गृह विभागाचे उपसचिव चेतन निकम यांनी कळविले आहे.

# महाडमध्ये 'विचार महापुरुषांचे' संघटनेची सहविचार सभा संपन्न; नव्या कार्यकारिणीची निवड

**महाड । प्रतिनिधी**

महाड तालुक्यासह संपूर्ण महाराष्ट्रात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार घरोघरी पोहोचवण्याच्या उद्देशाने स्थापन झालेल्या 'विचार महापुरुषांचे सामाजिक संघटने'च्या सहविचार सभेचे आयोजन महाड येथे नुकतेच करण्यात आले. संस्थापक अध्यक्ष नितीन लोखंडे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या सभेत संघटनेच्या नूतन कार्यकारिणीची निवड करण्यात आली.

वर्ष २०२१ मध्ये वराठी गावातील निष्ठावंत कार्यकर्ते नितीन लोखंडे यांनी या संघटनेची स्थापना केली होती. नवीन पिढीला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार मांडण्याची संधी मिळावी, तसेच गोर-गरीब विद्यार्थ्यांना शैक्षणिक लाभ मिळावा या उद्देशाने त्यांनी विविध उपक्रम राबवले. चार वर्षांच्या कार्यकाळात संघटनेने तळागाळातील जनतेपर्यंत पोहोचण्याचा संकल्प पूर्ण केला आहे.

सभेत नूतन कार्यकारिणीमध्ये अध्यक्ष म्हणून सुजित जाधव, उपाध्यक्ष योगेश शेलार, सचिव श्रद्धा गांभीरे, सहसचिव धर्मेंद्र जाधव, खजिनदार अल्पेश साळवी, कार्याध्यक्ष सुमित साळवी, व ऑडिटर राकेश देशमुख यांची निवड करण्यात आली. यावेळी विविध विषयांवर चर्चा करण्यात आली व संघटनेच्या पुढील वाटचालीबाबत दिशा ठरविण्यात आली.संस्थापक अध्यक्ष नितीन लोखंडे यांनी नूतन कार्यकारिणीला शुभेच्छा देत त्यांच्या कार्यास बळकटी देण्याचे आवाहन केले. या सहविचार सभेला महाड तालुक्यातील असंख्य तरुणांनी हजेरी लावली होती.


# मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी औद्योगिक आस्थापनांनी पुढाकार घ्यावा

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

चंद्रपूर हा औद्योगिक जिल्हा आहे. मोठ्या प्रमाणात येथील नागरिक औद्योगिक आस्थापनांमध्ये नोकरी करीत असून बहुतांश निवासस्थानेसुध्दा औद्योगिक परिसरात आहे. याव्यतिरिक्त आपापल्या क्षेत्रातील जास्तीत जास्त नागरिकांना मतदानाबाबत प्रवृत्त करणे, त्यांना मतदानाचे महत्व पटवून देणे, ही प्रशासनासोबतच औद्योगिक आस्थापनांचीसुध्दा सामाजिक जबाबदारी आहे. त्यामुळे आपल्या सामाजिक दायित्व निधीतून विविध उपक्रम राबविण्यासाठी औद्योगिक आस्थापनांनी पुढाकार घ्यावा, जेणेकरून जिल्ह्यात मतदानाची टक्केवारी वाढण्यास मदत होईल, असे आवाहन जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी केले.

मतदान जनजागृती अंतर्गत 'स्वीप' उपक्रम तसेच थिमॅटीक मतदान केंद्राच्या तयारीचा आढावा घेतांना ते बोलत होते. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा पोलिस अधिक्षक मुम्मका सुदर्शन, उपवनसंरक्षक श्वेता बोड्डू यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी व उद्योगांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी श्री. गौडा म्हणाले, महाराष्ट्रात एकाच दिवशी २० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदान होणार आहे. सर्व औद्योगिक आस्थापनांनी आपल्या कपंनीमध्ये कार्यरत कामगारांना मतदानाचा हक्क बजावता यावा, यासाठी २० नोव्हेंबर रोजी सार्वजनिक सुट्टी जाहीर करावी. आपात्कालीन परिस्थिती असेल तर तसे प्रशासनाला अवगत करून मतदानासाठी अर्ध्या दिवसाची सूट द्यावी. या आदेशाचे सर्वांनी काटेकोरपणे पालन करावे, अन्यथा औद्योगिक आस्थापनांवर कारवाई करण्यात येईल.



मतदान जनजागृती उपक्रमाचा जिल्हाधिका-यांनी घेतला आढावा

व्होटर इन्फॉर्मेशन स्लीप (मतदार माहिती चिठ्ठी) वाटपासाठी आपापल्या क्षेत्रातील बीएलओ यांच्याशी समन्वय ठेवण्यासाठी उद्योगांनी एक नोडल अधिकारी नेमावा. जेणेकरून लोकांना कुठे मतदान करावयाचे आहे, याची माहिती मिळणे सोयीचे होईल. लोकसभेमध्ये जिल्ह्यातील उद्योगांनी 'थिमॅटीक पोलिंग स्टेशन' तयार केले होते. आताही मतदानाच्या दिवसापूर्वी आकर्षक थिमॅटीक पोलिंग स्टेशन पूर्ण तयार होईल, याबाबत योग्य नियोजन करावे. त्यासाठी नोडल अधिका-यांची नियुक्त करावी.

मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी जिल्हा प्रशासनामार्फत विविध उपक्रम राबविण्यात येत आहे. यात मतदार जनजागृतीबाबत विद्यार्थ्यांमार्फत रॅली, पालकांना मतदानासाठी प्रवृत्त करणे, मतदानाचे महत्व अधोरेखीत करण्यासंदर्भात निबंध, चित्रकला, रांगोळी स्पर्धा तसेच ऑनलाईन प्रश्नमंजुषा घेण्यात येत आहे. असेच उपक्रम औद्योगिक आस्थापनांनीसुध्दा राबवावे, अशा सुचना जिल्हाधिकारी श्री. गौडा यांनी केल्या.बैठकीला चंद्रपूर फेरो अलाय, दालमिया सिमेंट, वेकोली (चंद्रपूर, वणी, माजरी), चमन मेटॅलिक, सिध्दबल्ली, बिल्ट बल्लारपूर, ग्रेस इंडस्ट्रिज, अंबूजा सिमेंट, पॉवर ग्रीड, माणिकगड सिमेंट, एसीसी सिमेंट, अल्ट्राटेक सिमेंट, लॉयड्स मेटल्स, गोपानी इंडस्ट्रिज, धारीवाल यांच्यासह एकूण २० औद्योगिक आस्थापनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .

# यशवंत माने यांचा उमेदवारी अर्ज दाखल, महायुतीचे शक्तिप्रदर्शन








**मोहोळ । प्रतिनिधी**

२४७ मोहोळ विधानसभा मतदारसंघातील लोकनेते परिवाराचे महायुतीचे व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे अधिकृत उमेदवार आमदार यशवंत (तात्या) माने यांनी प्रचंड शक्तिप्रदर्शन करत उमेदवारी अर्ज दाखल केला. या कार्यक्रमाचे आयोजन महाराष्ट्र राज्य सरकार परिषदेचे अध्यक्ष माजी आमदार राजन मालक पाटील यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले.

कार्यक्रमात महाराष्ट्र राज्य ओबीसीचे प्रदेशाध्यक्ष कल्याणराव आखाडे, भीमा साखर कारखान्याचे माजी व्हाईस चेअरमन कल्याणराव बाप्पा पाटील, लोकनेते शुगरचे चेअरमन बाळराजे पाटील, सिनेट सदस्य अजिंक्यराणा पाटील यांच्यासह महायुतीतील सर्व पक्षांचे जिल्हाध्यक्ष, कार्याध्यक्ष, तालुका अध्यक्ष, महिला पदाधिकारी आणि लाखो कार्यकर्ते उपस्थित होते.

यशवंत माने यांनी अनगर परिसरातील सर्व देवी-देवतांचे दर्शन घेऊन बाळराजे आणि अजिंक्यराणा पाटील यांच्या नेतृत्वात दहा ते बारा किलोमीटर लांबच्या अनगर ते मोहोळ रॅलीत भाग घेतला. या रॅलीचे रूपांतर मोठ्या सभेत झाले. कार्यक्रमात मोहोळ येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून मोहोळ बाजारपेठेपासून तहसील कार्यालयापर्यंत पदयात्रा काढण्यात आली.

यशवंत माने यांच्या नामांकन दाखल करण्यासाठी पंढरपूर तालुक्यातील १७ गावांच्या नागरिकांसह, उत्तर सोलापूर तालुक्यातील २४ गावांच्या लोकांनी आणि बंजारा समाजातील महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवली, ज्यामुळे या कार्यक्रमाने प्रचंड प्रतिसाद मिळवला.

## शेतकरी कुटुंबातील मुलगा ते यशस्वी उद्योजक अमित भालचंद्र चुरी यांची प्रेरणादायी कहाणी

**पालघर । नितीन बोंबाडे**

डहाणू तालुक्यातील वाणगाव केटखाडी येथील साध्या शेतकरी कुटुंबात जन्मलेले अमित भालचंद्र चुरी यांनी आपल्या दुर्दम्य इच्छाशक्तीच्या जोरावर जीवनात यश मिळवत उद्योगविश्वात आपले स्थान निर्माण केले आहे. त्यांनी आपल्या सामाजिक, राजकीय आणि व्यावसायिक प्रवासात अनेक अडचणींवर मात करत प्रेरणादायी यशस्वी कहाणी लिहिली आहे.

अमित चुरी यांच्या यशाच्या प्रवासाची सुरुवात मातोश्रींच्या मार्गदर्शनाखाली झाली. त्यांनी युवा नेते करण आनंद ठाकूर यांच्या नेतृत्वात युवक राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये कार्य करत अनेक ग्रामपंचायतीपासून ते विधानसभा, लोकसभा स्तरावर आपला प्रभाव निर्माण केला. शरद पवार व अजितदादा यांच्यासह मुख्यमंत्र्यांशी थेट



संपर्क साधत त्यांनी राजकीय क्षेत्रात आपले योगदान दिले.

अमित चुरी यांनी राजकारणाबरोबरच रियल इस्टेट व्यवसायात पाऊल ठेवले. सुरुवातीच्या काळात जुळलेले नाते अधिक दृढ होत गेले, त्यामुळे गुंतवणूकदारांचा विश्वासही त्यांच्यावर वाढत गेला. त्यांनी ठाणे, मुंबईतील गुंतवणुकीसह रियल इस्टेटमध्ये मोठे स्थान निर्माण केले. युरोप, अमेरिका, दुबई, जपान दौऱ्यातील तंत्रज्ञानाचा वापर करून व्यवसायात अधिक वृद्धी साधली.व्यवसायात यशस्वी असतानाही अमित चुरी यांनी सामाजिक क्षेत्रात नावलौकिक न मिळवता अदृश्य मदतीतून अनेकांना सहाय्य केले. त्यांनी आरोग्य, शिक्षण, आणि अन्य सामाजिक क्षेत्रात मदत करत अनेक तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या. त्यांच्या या कामामुळे त्यांच्यावर समाजाचा विश्वास दृढ झाला आहे, त्यामुळे विविध राजकीय नेत्यांचा त्यांच्याकडे वाढता राबता आहे.अमित भालचंद्र चुरी यांच्या धाडसाने आणि आत्मविश्वासाने उभारलेला व्यवसाय व त्यांची सामाजिक बांधिलकी अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

## काँग्रेसचे उमेदवार संतोष रावत यांनी दाखल केले नामांकन अर्ज,हजारो कार्यकर्त्यांचा सहभाग


**मूल । प्रतिनिधी**

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष संतोष रावत यांनी आज (२९ ऑक्टोबर) रोजी काँग्रेस पक्षाच्या उमेदवारीसाठी आपला अर्ज दाखल केला. यावेळी हजारो कार्यकर्त्यांची उपस्थिती होती, आणि आनंदोत्सवात सजलेल्या रॅलीने वातावरण गजबजले होते. विधानसभेतील विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांच्यासह अनेक नेत्यांनी या प्रसंगी आपली उपस्थिती दर्शविली.

रॅलीची सुरुवात नागपूर रोडवरील रम्यज्योत लॉन येथून झाली. दुपारी १ वाजता निघालेली रॅली २.४५ वाजता प्रशासकीय भवनासमोर पोहोचली, जिथे संतोषसिंह रावत यांनी आपला नामांकन अर्ज सादर केला. या वेळी काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस आणि घटक पक्षाचे अनेक मान्यवर नेते सहभागी होते.शेवटच्या दिवशी विविध पक्षांच्या आणि अपक्ष उमेदवारांनी देखील अर्ज दाखल केले.



## मद्याच्या आहारी गेलेल्या इंदलच्या मृत्यूची घटना–भावाच्या मारहाणीत जीवन संपले



पोलीस निरीक्षक पवन देसले



सहायक पोलिस निरीक्षक प्रशांत कंडारे

**धरणगाव । प्रशांत कुंडकर**

महात्मा गांधींनी त्यांच्या जीवनकाळात मद्यपानाचा कठोर निषेध केला होता. २ ऑक्टोबर गांधी जयंतीसारख्या विशेष प्रसंगी मद्यविक्री बंद ठेवण्याचा शासन निर्णय आहे. अती मद्यपानाच्या दुष्परिणामांबद्दल सर्वसामान्यांना जागृती आहे, परंतु आर्थिक दृष्टिकोनातून महसूल वाढविण्यासाठी मद्य विक्री चालू ठेवली जाते. हीच मद्याची आहारी गेलेल्या व्यक्तींच्या कुटुंबांना मात्र मोठा फटका बसतो, ज्यामुळे आर्थिक आणि सामाजिक समस्यांचा सामना करावा लागतो.

धरणगाव तालुक्यातील सावदे प्र.चा. येथे इंदल प्रकाश वाघ, जो खदाण कामगार होता, त्याच्या मद्याच्या आहारी जाण्याच्या सवयीमुळे कुटुंबातील शांतता भंग होत होती. दारूच्या नशेत घरी आल्यावर त्याचा त्रास इतर सदस्यांना सहन करावा लागत होता. त्याच्या या सवयीमुळे पत्नीने देखील त्याच्यापासून दूर राहणे पसंत केले. एकाकी जीवनामुळे इंदलची मद्यपानाची सवय अधिकच बळकट झाली होती.

१० ऑगस्ट रोजी रात्री, इंदल मद्यप्राशन करून घरी आला आणि आपल्या आईकडे






मागणी करून १५०० रुपये दारू पिण्यासाठी घेतले. मोठ्या आवाजात मोबाईलवर गाणे ऐकण्यामुळे त्याची भाची झोपेतून उठली आणि रडू लागली. त्याच्या या त्रासाला वैतागून भावाने, दिपकने त्याच्यावर संताप व्यक्त केला आणि दोघांमध्ये धक्काबुक्की झाली. या झटापटीत इंदल जखमी झाला आणि घराबाहेर पडला.

गावाबाहेरील बसस्थानकाजवळ असलेल्या एका बाकाजवळ, दिपकने रागाच्या भरात इंदलच्या डोक्यावर लाकडाने आणि दगडाने हल्ला केला. या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या इंदलचा घटनास्थळीच मृत्यू झाला. सकाळी गावकऱ्यांना इंदलचा मृतदेह आढळून आला आणि पोलिसांना कळवण्यात आले.

धरणगाव पोलिसांनी तपास करून संशयित दिपक प्रकाश वाघला अटक केली आहे. त्याच्यावर भारतीय न्यायसंहितेच्या कलम ३०२ नुसार गुन्हा नोंदवण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक पवन देसले यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक प्रशांत कंडारे करत आहेत.

## पंजाबराव पाटील हडपकर यांचा थेट इशारा–अयरे गयरे यांना नाही थारा

**नांदेड । बालाजी पाटील**

हदगाव–हिमायतनगर विधानसभा मतदारसंघात काँग्रेसचा प्रभाव ठाम आहे, असे जिल्हा परिषद सदस्य पंजाबराव पाटील हडपकर यांनी ठामपणे सांगितले. येथील विद्यमान आमदार माधवराव पाटील जवळगावकर यांच्या नेतृत्वाखाली मतदारसंघातील शेतकरी, कष्टकरी, कामगार वर्ग काँग्रेसच्या पाठिशी ठाम उभा आहे, त्यामुळे काही व्यक्ती पक्ष सोडल्याने काँग्रेसवर कोणताही परिणाम होणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.काँग्रेस पक्ष हा सर्व धर्म समभाव बाळगणारा लोकशाही पक्ष आहे. येथे हुकूमशाही चालणार नाही; सर्वांना सोबत घेऊन चालणारा हा पक्ष आहे, असे हडपकर यांनी सांगितले.



## घर घर लंगर सेवा करणार कष्टकरी मजुरांची दिवाळी गोड

**दैनिक राज आनंद । अहिल्यानगर । प्रतिनिधी**

गुरु अर्जुन सामाजिक प्रतिष्ठान संचलित घर घर लंगर सेवेच्या माध्यमातून यावर्षी देखील शहरातील श्रमिक कामगार व मजुरांना दिवाळी फराळचे मोफत वाटप केले जाणार आहे. कष्टकरी मजुरांची दिवाळी गोड करण्यासाठी घर घर लंगर सेवेच्या वतीने दिवाळी फराळसाठी मदतीचे आवाहन करण्यात आले आहे.शहर आणि आसपासच्या भागात रस्ते, पूल आणि इतर सार्वजनिक प्रकल्पांवर काम करणाऱ्या स्थलांतरित मजुरांनाही दिवाळीचा आनंद साजरा करता यावा या उद्देशाने लंगर सेवेच्या माध्यमातून त्यांना फराळचे वाटप केले जाणार आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून मजूरांचे घर दिव्यांनी प्रकाशमान करुन दिवाळीचा सण त्यांना साजरा करता येणार आहे.त्याचबरोबर कामगारांना मिठाई, दिवे आणि फटाके वितरित करण्याचा संस्थेचा मानस आहे. दिवे, फटाके व फराळचा समावेश असलेल्या एका किटची किंमत ५० अंदाजे रुपये असून, प्रत्येक कामगारांना ही किट वितरीत केली जाणार आहे.

## अज्ञात वाहनाच्या धडकेत एक ठार,दोन गंभीर जखमी; दोन तास वाहतूक ठप्प

**वरोरा । प्रतिनिधी**

वरोरा–चिमूर राष्ट्रीय महामार्ग ३५३ ई वर चारगाव खुर्दजवळ भीषण अपघात झाला, ज्यात अज्ञात वाहनाने दुचाकीला धडक दिली. या दुर्घटनेत हिमांशू भाविक जुनारकर (वय २२) हा तरुण जागीच ठार झाला, तर आदर्श विजय तुराणकर आणि साईल श्रावण बावणे हे दोघे गंभीर जखमी झाले आहेत. जखमींना उपचारासाठी उपजिल्हा रुग्णालय वरोरा येथे दाखल करण्यात आले.

अपघातानंतर परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले. घटनास्थळी चिमूर उपनिरीक्षक राकेश जाधव आणि शेगाव पोलीस ठाण्याचे ठाणेदार योगेश यादव यांनी हजेरी लावली. अपघातग्रस्त कुटुंबीयांनी नुकसान भरपाई मिळेपर्यंत मृतदेह उचलण्यास नकार दिला, त्यामुळे दोन तास महामार्गावरील वाहतूक ठप्प झाली होती.

दरम्यान, अज्ञात वाहनाचा संशयित ट्रक शेगाव जवळ चंदणखेडा टी–पॉईंटवर आढळून आला,



पोलिसांनी बॅरेलसह दोन संशयितांना ताब्यात घेतले आहे. या घटनेचा निषेध म्हणून जमावाने महामार्गावर टायर जाळून संताप व्यक्त केला.



**जोरदार शक्तीप्रदर्शन करत कर्जत खालापूर चे उद्धव बाळासाहेब ठाकरे सेनेचे (महाविकास आघाडी) नितीन सावंत यांनी उमेदवारी अर्ज दाखल**

## चार वर्षांच्या मुलाची आईच्या प्रियकराकडून हत्या; लघुशंका केली म्हणून लाथाबुक्क्यांनी मारहाण

**मुंबई(प्रतिनिधी)**–कुर्ला येथे ओमकार नावाच्या एका चार वर्षांच्या मुलाची त्याच्याच आईच्या प्रियकराने हत्या केल्याची खळबळजनक घटना उघडकीस आली आहे. विजारीवर लघुशंका केली म्हणून त्याने मुलाला लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केल्याचे तपासात समोर आले आहे. याप्रकरणी हत्येच्या गुन्ह्यांत रितेशकुमार चंद्रवंशी या आरोपी प्रियकराला नेहरूनगर पोलिसांनी अटक केली आहे. कुर्ला येथील नेहरुनगर, साबळेनगर, पत्रा चाळीत पूजाकुमारी ही महिला तिच्या दोन मुलांसोबत राहते. आरोपी हा तिच्या मामाच्या मुलीचा मुलगा असून या दोघांचे एकमेकांवर प्रेम करत होते. तिचे तिच्या पतीसोबत वाद असल्याने ती सध्या रितेशकुमारसोबत लिव्ह इन



रिलेशनशीपमध्ये राहत होती. तिचा चार वर्षांचा मुलगा ओमकार याने रितेशकुमारच्या विजारीवर लघुशंका केली. त्याचा त्याला राग आला आणि त्याने त्याला लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली होती. त्यात तो गंभीररीत्या जखमी झाल्याने त्याला उपचारासाठी सायन रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. पण उपचार सुरू असताना त्याचा मृत्यू झाला होता. शवविच्छेदन अहवालात त्याचा मारहाणीत मृत्यू झाल्याचे उघडकीस आले होते. त्यामुळे पूजाकुमारी हिच्या तक्रारीवरुन पोलिसांनी तिचा प्रियकराविरुद्ध हत्येचा गुन्हा दाखल केला होता.

### भव्य मोटरसायकल रॅलीसह शक्तीप्रदर्शन करीत प्रचंड मोठ्या

# जनसमुदायाचा आशीर्वाद घेऊन महायुतीचे उमेदवार शहाजीबापू पाटील यांचा उमेदवारी अर्ज दाखल

## मतदार बंधू-भगिनींच्या आशीर्वादावरती मी नामदार होईन : आमदार शहाजीबापू पाटील

**सांगोला । प्रतिनिधी**

उद्याची विधानसभा निवडणूक ही सर्वसामान्यांच्या विकासासाठी आहे. तालुक्यातील प्रत्येक घरातील व्यक्ती समृद्ध करण्याचे माझे ध्येय आहे .सांगोला तालुका हिरवागार होईपर्यंत हा शहाजीबापू पाटील स्वस्त बसणार नाही. सांगोला तालुक्यातील एक गावही पाण्यापासून वंचित राहणार नाही याची दक्षता घेतली आहे. उद्याच्या विधानसभा निवडणुकीत प्रचंड मतांनी मला विजयी करावे मी तालुक्यात नामदार म्हणूनच परत येईन असे प्रतिपादन आमदार शहाजीबापू पाटील यांनी सांगोला येथे केले .




सांगोला विधानसभा मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार आमदार शहाजीबापू पाटील यांचा उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी सोमवार दिनांक २८ ऑक्टोबर २०२४ रोजी भव्य मोटार सायकल रॅली काढण्यात आली. रॅलीनंतर मतदार बंधू भगिनींचे आशीर्वाद घेण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज चौक ,शिवतीर्थ येथे सभा घेण्यात आली. यावेळी मतदार बंधू-भगिनींना मार्गदर्शन करताना आमदार शहाजीबापू पाटील हे बोलत होते.

पुढे बोलताना आमदार शहाजीबापू पाटील म्हणाले, मी यापूर्वी ७ विधानसभा निवडणुका या स्व. आमदार गणपतराव देशमुख यांच्या विरोधात लढविल्या . विधानसभेची ही आठवी निवडणूक नवख्या उमेदवाराविरुद्ध लढवत आहे. विरोधकांनी माझ्यावर टीका करण्यापेक्षा तुम्ही तुमची काळजी घ्या .ही लढाई विकासासाठी आहे. तालुक्यात मतदारांमध्ये विष पेरायचे काम कोणीही करू नये. तालुक्यात युवकांची मोठी ताकद असून मी केलेल्या विकास कामावर जनतेचा पूर्णपणे विश्वास आहे. त्यामुळे कोणी काहीही केले तरी विजयाचा गुलाल हा माझाच आहे .असा ठाम विश्वास आमदार शहाजीबापू पाटील यांनी सभेसाठी उपस्थित असलेल्या मतदार बंधू-भगिनींना दिला. यावेळी सुभाषभाऊ इंगवले, राणीताई माने, दादासाहेब लवटे, शंकर दुधाळ, श्रीकांतदादा देशमुख, डॉ. विजय बाबर ,नवनाथभाऊ पवार, ड .बंडू काशीद ,धोंडीराम घोलप , दीपक ऐवळे , शिवाजीनाना पवार शिवाजीअण्णा गायकवाड, धनाजी पवार, धनंजय चव्हाण ,,विकास वलेकर, श्रीकांत पाटील, आदी मान्यवरांनी आपल्या मनोगतात सांगितले की, राज्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पुन्हा मुख्यमंत्री पदाची संधी देण्यासाठी व तालुक्यात आमदार शहाजीबापू पाटील यांना विजयी करून नामदार करण्यासाठी ही २०२४ सालातील विधानसभा निवडणूक चुरशीची ठरणार आहे .यामध्ये मतदार बंधू-भगिनींनी गाफिल न राहता बापूंच्या कार्यकर्तृत्वावर व केलेल्या कामावर खुश होऊन मोठ्या मनाने बापूंना भरघोस मतांची आघाडी देऊया. सांगोला तालुक्यात महायुतीची जागा निवडून आणायची आहे. बापूंना मंत्रिपद मिळणार आहे. राज्यातील इतर कोणत्याही तालुक्यात सांगोला तालुक्याइतका विकास निधी आला नाही हे श्रेय बापूंचे आहे. हे आपण आनंदाने मान्य करून बापूंची इच्छा, आकांक्षा पूर्ण करूया .आमदार शहाजीबापू पाटील यांनी तालुक्यात ५ हजार ५०० कोटी रुपयांचा विकास निधी आणून प्रत्येक गावामध्ये विकास घडवून आणला आहे. भाळवणी गटातून १० हजार मतांची आघाडी देऊ असा विश्वास धोंडीराम घोलप यांनी यावेळी व्यक्त केला. यावेळी सभेसाठी सागरदादा पाटील ,दिग्विजयदादा पाटील, चेतनसिंह केदार सावंत, आनंदाभाऊ माने, माऊली तेली , अस्मिर तांबोळी ,कीर्तीपाल बनसोडे, उद्योगपती आनंद घोंगडे ,अरुण बिले ,अच्युत फुले, विजयदादा शिंदे, समीर पाटील , जगदीश पाटील, गुंडादादा खटकाळे, धनंजय काळे, अभिजीत नलवडे, रविराज शिंदे, बाळासाहेब आसबे ,भारत चव्हाण,अजिंक्य शिंदे, समाधान सावंत ,सोमेश्वर यावलकर, आयुब मुलाणी, दीपक दिघे यांच्यासह महायुतीच्या घटक पक्षातील शिवसेना, भारतीय जनता पार्टी, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया, रयतक्रांती संघटना या पक्षांचे पदाधिकारी ,कार्यकर्ते, मान्यवर व मतदार बंधू भगिनी तसेच युवक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**महायुतीचे उमेदवार आमदार शहाजीबापू पाटील यांच्या नेतृत्वावर व कार्यावर विश्वास ठेवून सांगोला शहर व तालुक्यातील अनेकांनी आमदार शहाजीबापू पाटील यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेमध्ये प्रवेश केला .प्रवेश केलेल्या मान्यवरांमध्ये फिरोज खाटीक, भाऊसाहेब नवले, अल्ताफ मुलाणी, सद्दाम मुलाणी ,बशीर मुलाणी, हणमंत येलपले, विनायक पवार यांच्यासह आदी मान्यवरांनी शिवसेनेत प्रवेश करून आमदार शहाजीबापु पाटील यांचे हात बळकट करण्यासाठी योगदान देण्याचे जाहीर केले.उमेदवार आमदार शहाजीबापू पाटील यांचा उमेदवारी अर्ज भरण्यासाठी जनसमुदायाची भव्य मोटरसायकल रॅली काढण्यात आली .त्यानंतर उपस्थितांना मार्गदर्शन करण्यासाठी सभा घेण्यात आली व जनसमुदायाचा आशीर्वाद घेऊन आमदार शहाजीबापू पाटील यांनी आपला उमेदवारी अर्ज तहसील कार्यालय येथे दाखल केला. यावेळी तालुक्यातून प्रचंड जनसमुदाय, बंधू-भगिनी व युवक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.**

**आमदार शहाजी बापू पाटील यांचा महायुतीतून अर्ज भरण्यात आला. उमेदवारी अर्ज भरण्यासाठी आमदार शहाजीबापू पाटील, ड .उदयबापू घोंगडे, भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार - सावंत ,माजी नगराध्यक्ष रफिकभाई नदाफ, शिवसेनेचे तालुकाप्रमुख दादासाहेब लवटे हे मान्यवर उपस्थित होते.**

# भोपसेवाडी येथील शिवसेना (उबाठा) पक्षाच्या कार्यकर्त्यांचा शेकाप मध्ये प्रवेश



**सांगोला । प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शेतकरी कामगार पक्षाकडून जोरदार मोर्चेबांधणी सुरू आहे. शेतकरी कामगार पक्षाचे नेते डॉक्टर बाबासाहेब देशमुख व डॉक्टर अनिकेत देशमुख यांच्या यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून भोपसेवाडी येथील शिवसेना (उबाठा) व माजी आमदार दीपक आबा साळुंखे पाटील यांच्या कट्टर कार्यकर्त्यांनी सोमवार दिनांक २८ ऑक्टोबर रोजीशेतकरी कामगार पक्षात प्रवेश केला आहे. डॉ. बाबासाहेब देशमुख यांच्या उपस्थितीत हा पक्ष प्रवेश सोहळा झाला. आगामी विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर हा प्रवेश झाल्याने सांगोला तालुक्यात राजकीय चर्चांना उधाण आले आहे.यावेळी मायाप्पा यमगर,महेश बंडगर,हरीबा कोळेकर,सोपान बंडगर यांच्यासह भोपसेवाडी येथील पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.पक्ष नेतृत्वाच्या मनमानी कारभाराला कंटाळून निष्ठावंत कार्यकर्त्यांनी शेतकरी कामगार पक्षाचे डॉक्टर बाबासाहेब देशमुख व डॉक्टर अनिकेत देशमुख यांच्या नेतृत्वाखाली काम करण्याचा निर्णय घेतला आहे. सदर पक्ष प्रवेशासाठी मायाप्पा यमगर, महेश बंडगर व सोपान बंडगर यांनी प्रयत्न केले.सांगोला तालुक्यातील भोपसेवाडी येथील शिवसेना (उबाठा) पक्षाच्या अंतर्गत राजकारणाला व सध्याचे नेते यांना कंटाळून निष्ठावंत कार्यकर्त्यांनी पक्षाला अखेरचा निरोप दिला व शेकाप पक्षात प्रवेश केला. यावेळी डॉ बाबासाहेब देशमुख यांनी सर्वांचे स्वागत करून शेतकरी कामगार पक्षात आपणास योग्य तो मानसन्मान दिला जाईल असे आश्वासन देवून सर्वांचे स्वागत केले.भोपसेवाडी येथील शिवसेना (उबाठा) पक्षाच्या व मा.आम. दीपक आबा साळुंखे पाटील यांच्या निष्ठावंत कार्यकर्त्यांनी शेतकरी कामगार पक्षात प्रवेश केल्याने कार्यकर्त्यामध्ये उत्साहाचे वातावरण आहे. विधानसभा निवडणुकीत शेतकरी कामगार पक्षाचे उमेदवार डॉक्टर बाबासाहेब देशमुख यांना जवळा भागतून विक्रमी मताधिक्य देण्याचा निर्धार प्रवेश केलेल्या कार्यकर्त्यांनी व्यक्त केला.

### पाच वर्षे काडीचेही काम न करणाऱ्या

# विद्यमान लोकप्रतिनिधी कडून माझ्या कामांचे श्रेय घेण्याचा प्रयत्न-शिवाजीराव कर्डिले

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

राहुरी-नगर-पाथर्डी मतदारसंघात आमदार असताना विकासाची गंगोत्री आणण्यात यश आले होते. सिंचनापासून अनेक प्रश्नांची सोडवणूक केली. सत्तेत असलो नसलो तरी विकासकामांसाठी निधी कमी पडू दिला नाही. दुर्दैवाने मागील पाच वर्षांत मतदारसंघात काडीचेही काम झाले नाही. विकासकामांना खीळ बसली. मी आमदार असताना केलेल्या विकासकामांचे श्रेय घेण्याचे काम करीत विद्यमान लोकप्रतिनिधी केवळ नारळ फोडत बसले. भावनिक मुद्द्यांवर त्यांना एकदा यश आले मात्र आता जनतेच्या भावना बदलल्या असून यावेळी मतदारसंघात परिवर्तन अटळ आहेत. महायुती सरकारच्या कामगिरीवर जनता खूष असून त्याचे प्रत्यंतर निकालात दिसेल असे प्रतिपादन राहुरी विधानसभा मतदारसंघातील भारतीय जनता पार्टीचे उमेदवार माजी मंत्री शिवाजीराव कर्डिले यांनी केले.



राहुरी-नगर-पाथर्डी मतदारसंघातून भाजपची उमेदवारी जाहीर होताच माजी मंत्री कर्डिले यांनी मतदारसंघात प्रचाराला वेग दिला आहे. त्यांनी राहुरी तालुक्यातील डिग्रस, मुळानगर, वरवंडी, बाभुळगाव, धामोरी बुद्रुक, धामोरी खुर्द, खडांबे बुद्रुक, खडांबे खुर्द, वांबोरी स्टेशन, सडे, वाघाचा आखाडा, राहुरी स्टेशन, गावठाण तांदूळवाडी, कोंढवड, शिलेगाव, करपेवाडी, केदळ बुद्रुक, केंद्र खुर्द, चंडकापूर, पिंप्री वळण, वळण, मानोरी, आडगाव या गावांना भेटी देत मतदारांशी संवाद साधला. प्रत्येक गावांत मतदारांनी प्रचंड उत्साहात ढोल ताशाच्या गजरात कर्डिले यांचे स्वागत केले. मतदारांशी संवाद साधताना कर्डिले यांनी मतदारसंघाची झालेली दुर्दशा बदलण्याची ग्वाही देत यंदा परिवर्तनासाठी साथ देण्याचे आवाहन केले.

कर्डिले म्हणाले, संपूर्ण देशाचा विकास केल्यामुळे नरेंद्र मोदी सलग तिसऱ्यांदा पंतप्रधानपदी विराजमान झाले आहेत. केंद्र व राज्यात एका विचाराचे सरकार असल्याने सर्वसामान्यांना लाभ होत आहे. प्रधानमंत्री पीक विमा योजना, शेतकऱ्यांसाठी मोफत वीज, कृषी सन्मान योजना, लाडकी बहिण योजना, विद्यार्थीनींना मोफत उच्च शिक्षण, दुधाला प्रतिलिटर ७ रूपये अनुदान असे अनेक कल्याणकारी निर्णय घेतल्याने जनतेच्या मनात महायुतीबद्दल आपुलकीची भावना आहे. प्रचारा दरम्यान मिळणारा उत्स्फूर्त प्रतिसाद परिवर्तनाची नांदी ठरत आहे. या प्रचार दौऱ्यावेळीसुरेश बानकर, शरद पेरणे, लिलाबाई तनपुरे, विश्वास तनपुरे, लक्ष्मण तनपुरे, तानाजी धुमाळ, विनीत धुमाळ, उत्तम म्हसे, कडू आप्पा म्हसे, रविंद्र म्हसे, कुंडलिक खिलारी, सुभाष गायकवाड, गोरक्षनाथ तारडे, नाना मानगुडे, विजया मानगुडे, सुरेश गायकवाड,लक्ष्मण आढाव, अनिल आढाव, जालिंदर आढाव, गोविंद आढाव,सुभाष आढाव, राजेंद्र आढाव उपस्थित होते.गावागावात कर्डिले यांचे स्वागत करताना विविध पदाधिकारी, कार्यकर्ते अतिशय उत्साहात होते. शिवाजीराव कर्डिले हे जनतेच्या सुखदु:खात सहभागी होतात. त्यांच्याशी थेट संपर्क साधता येतो. अहमदनगर जिल्हा बँक थेट शेतकऱ्यांच्या दारात नेण्याचे काम त्यांनी केले. दूध धंदा वाढावा, शेतकऱ्यांच्या हातात चार पैसे पडावेत यासाठी त्यांनी गायी म्हशी खरेदीसाठी सहज कर्ज उपलब्ध करून दिले. राज्यात आगामी काळात पुन्हा महायुतीचे सरकार येणार आहे. राहुरी मतदारसंघातील जनता कर्डिले यांनाच आमदार करणार असून आगामी सरकारमध्ये दुग्धविकास मंत्री बनून त्यांनी शेतकऱ्यांना न्याय देण्याचे काम करावे, असे आवाहन वक्त्यांनी यावेळी केले.

# कोल्हापुरात पाण्याच्या बाटली वरून सराईत गुन्हेगारांकडून हत्या

**कोल्हापूर । मनोज उतेकर**

पाण्याची बाटली देण्यास नकार दिल्याने कोल्हापुरातील एका सराईत गुन्हेगाराने दगडाने ठेचून सतीश महादेव पाटील (वय ४८, रा. कोरगावकर कंपाऊंड, शाहूपुरी, कोल्हापूर) यांचा खून केला. हा धक्कादायक प्रकार सोमवारी पहाटे कोरगावकर कंपाऊंडजवळ घडला. या प्रकरणी शाहूपुरी पोलिसांनी रोहन ऊर्फ चिक्या विजय गायकवाड (वय २४, रा. कनाननगर, कोल्हापूर) याच्यासह तिघांना अटक केली आहे.

सतीश पाटील, जो कोरगावकर कंपाऊंडजवळच राहतो आणि विविध कामे करतो, रविवारी रात्री उशिरा आपल्या भावाच्या घरी जेवण करून झोपण्यासाठी हातात पाण्याची बाटली घेऊन एका दुकानाजवळ थांबला होता. याचवेळी आरोपी रोहन गायकवाडने त्याच्याकडे पाण्याची बाटली मागितली. मात्र, सतीशने नकार दिल्याने गायकवाड तेथून निघून गेला. दहा-पंधरा मिनिटांनी गायकवाड, सौरभ जाधव व इतर साथीदारांसह पुन्हा तेथे येऊन सतीशवर हल्ला केला. या हल्ल्यात सतीशच्या डोक्यात



मोठा दगड घालून त्याचा खून करण्यात आला. या घटनेची माहिती मिळताच शाहूपुरी पोलीस घटनास्थळी दाखल झाले. परिसरातील सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे हल्लेखोरांची ओळख पटली. चौकशीतून संशयितांना पोलिसांनी ताब्यात घेतले आणि गुन्ह्याची कबुली मिळवली. सौरभ जाधव याच्यावर यापूर्वी हद्दपारीची कारवाई करण्यात आली आहे. आरोपींमध्ये एक बाल गुन्हेगारही सामील असल्याचे समजते.सतीशचे मूळ गाव हसूर दुमाला, तालुका करवीर आहे. त्याने विक्रमनगर येथे घर बांधले असून त्याची पत्नी व दोन मुलं तेथे राहतात. शाहूपुरीत त्याचे वास्तव्य कायम होते. सतीशच्या खुनाची बातमी मिळताच कुटुंबीयांनी आक्रोश केला.कोल्हापुरातील मध्यवर्ती ठिकाणी झालेल्या या खुनामुळे शहरात खळबळ उडाली आहे. निवडणूक आचारसंहिता आणि दिवाळीच्या तोंडावर घडलेल्या या घटनेने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण केले आहे.

# धनत्रयोदशीच्या शुभमुहूर्तावर संगमनेर विधानसभा मतदारसंघातून अर्ज दाखल

**संगमनेर । प्रतिनिधी**

महायुतीच्या वतीने शिवसेना पक्षाची उमेदवारी अमोल खताळ पाटील यांना जाहीर झाल्यानंतर शेवटच्या दिवशी मा.ना.श्री. राधाकृष्ण विखे पाटील, डॉ. अशोक इथापे, ज्ञानेश्वर कर्पे, रामभाऊ रहाणे, जावेद भाई जहागीरदार, राहुल भोईर, कैलास कासार, अण्णासाहेब गोडसे, कविताताई पाटील, सुनिताताई शेळके, कांचनताई यांच्यासह महायुतीतील घटक पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते व मायबाप जनतेच्या उपस्थितीत उमेदवारी अर्ज दाखल केला. ही लढाई धनशक्ती विरूध्द जनशक्ती अशी आहे. एक सामान्य घरातील व्यक्ती म्हणून माझी नाळ ही थेट मातीशी आणि या मातीतल्या लोकांशी थेट जोडलेली आहे. आता पर्यंत दहशतीत जगत आलेल्या या मातीतील सामान्य लोकांना दहशतमुक्त करण्यासाठी मी रणांगणात उतरलोय. संगमनेरच्या जनतेची सेवा, महिला, शेतकरी व कष्टकऱ्यांचा सन्मान आणि महाराष्ट्राचा स्वाभिमान कायम राखण्याची ही महत्वाची लढाई लढण्यासाठी आपण सर्वजण सज्ज आहोत. असी भावना अमोल खताळ पाटील यांनी व्यक्त केली आहे .संगमनेरची जनता प्रचंड बहुमताने निवडून देऊन मतदारसंघातील प्रत्येक गावाच्या, वाड्या वस्त्यांच्या आणि दुष्काळी भागातील शाश्वत विकासाच्या मार्गावर चालण्याची संधी देईल, हा विश्वास व्यक्त केला आहे.